अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०७

नगरसचिव कार्यालय
दिनांक : १२/०३/२०२१

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा क्र.०७ गुरूवार दि.१८/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात आरोग्य विषयक निकष, कोवीड १९ संदर्भातील विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने / उपस्थीतीने खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

मा.शासन आदेशान्वये सदर सभेत मास्कचा वापर, योग्य शारीरीक अंतर,हाताची स्वच्छता,सर्दी व खोकतांना घ्यावयाची काळजी,सॅनिटायझरचा वापर यांचे पालन करुन सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

गुरूवार दिनांक - १८/०३/२०२१ ची विषय पत्रिका

| विषय क्र. | विषय सुची |
|---|---|
| ९२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेस सादर करणेबाबत. |

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. १२**
**(ऑनलाईन झुम ॲप व्दारे)**

विषय क्रमांक- १९४ गुरूवार दि.१०/०३/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-**

विषय - सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेत घेणेबाबत

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. तरी अंदाजपत्रकाचा विषय मा.स्थायी समिती सभेत घेणे यावा. ही विनंती.

येणेप्रमाणे मा.आयुक्त साहेब यांचे पत्र

नगरसचिव श्री. तडवी :- श्री. भुसारे , स्वीय सहाय्यक मा. सभापती सो. यांचे निदर्शनास आणून दयावे व तारीख व वेळ घ्यावी.

मा.सभापती साहेब :- अर्थसंकल्पीय सभा दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा. काढण्यात यावी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर

--***--

**चर्चा :-**

माजी केंद्रीय मंत्री, माजी खासदार आणि भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते दिलीपजी गांधी यांचे काल पहाटे ३.३० वा दिल्ली् येथे निधन झाले.गांधी, यांनी तीनवेळा नगर दक्षिण मतदारसंघाचे खासदार म्हणून प्रतिनिधित्व केले आहे.आपण त्यांना भावपुर्ण श्रध्दांजली वाहण्याकरीता दोन मिनीटे उभे रहावे हि विनंती.

मा.आयुक्त साहेब यांचा नव्याने महानगरपालिकेमध्ये नियुक्ती झाल्याने त्यांचे स्वागत करून त्यांचा मा.स्थायी समिती सभापती यांच्या हस्ते सत्कार करण्यात येत आहे.

मा.आयुक्त साहेब हे सभापती नवनिर्वाचीत सभापती मा.श्री.अविनाश हरिभाउ घुले यांचा सत्कार करतील.



मा.आयुक्तसाहेब अहमदनगर महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मा.स्थायी समितीस सादर करतील.

महानगरपालिकेचे सन २०२१-२२ चे ६८५ कोटीचे अंदाजपत्रक सादर.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन-२०२१-२०२२ चे ६८४ कोटी ८९ लाखाचे मुळ अंदाजपत्रक दि.१८/०३/२०२१ रोजी मा.स्थायी समितीस सभापती श्री. अविनाश घुले यांचेकडे मा.आयुक्त श्री. शंकर गोरे यांनी सादर केले.

मा.आयुक्त साहेब अर्थसंकल्पावरील आपले मनोगत व्यक्त करतील.

मा.आयुक्त साहेब :- सादर केलेल्या अंदाजपत्रकात महसुली उत्पन्न रू.३०५ कोटी ९५ लाख, भांडवली जमा रू.३३२ कोटी ६३ लाख धरणेत आले आहे. महसुली उत्पन्नात संकलीत करापोटी रू.४० कोटी ५० लाख, संकलीत करावर आधारीत करापोटी ५३ कोटी २४ लाख, जी.एस.टी. अनुदान १०३ कोटी ४० लाख व इतर महसुली अनुदान रू.९ कोटी ३३ लाख , गाळा भाडे ३ कोटी, पाणीपटटी २२ कोटी, मिटरद्वारे पाणी पुरवठा पोटी ४२ कोटी, संर्कीण ९ कोटी इ. महत्वाच्या बाबीसह महसुली खर्च २५५ कोटी २४ लाख धरण्यात आला आहे. तसेच भांडवली कामांवर अनुदान, कर्ज व मनपा हिस्सा धरून रू.३८५ कोटी ७१ लाख अंदाजित जमा होणार आहेत.

तसेच खर्च बाजूस वेतन, भत्ते व मानधनावर १२२ कोटी, पेन्शन ३८ कोटी, पाणी पुरवठा विज बील ३१ कोटी ५० लाख, स्ट्रीट लाईट विज बील ६ कोटी ५० लाख, शिक्षण मंडळ वर्गणी ४ कोटी, महिला व बाल कल्याण योजना ५१ लाख , अपंग पुनर्वसन योजना ५१ लाख , मागासर्वीय कल्याणकारी योजना १ कोटी ५२ लाख, मा.सदस्य मानधन १ कोटी ८० लाख औषधे व उपकरणे ६० लाख, मा.सदस्य प्रभाग स्वेच्छनिधी ६ कोटी ११ लाख , कचरा संकलन व वाहतूक ५ कोटी, पाणी पुरवठा साहित्य खरेदी व दुरूस्ती ७० लाख, टँकरद्वारे पाणी पुरवठा व तुरटी, ब्लिचिंग पावडर खरेदी १ कोटी ८२ लाख, अशुध्द पाणी आकार २ कोटी, विविध वाहने खेरेई १ कोटी ८५ , नविन रस्ते १ कोटी ७५ लाख , रस्ते दुरूस्ती १ कोटी ७५ लाख, इमारत दुरूस्ती ४० लाख, शहरातील ओढ नाले साफसफाई ४१ लाख, आपत्कालीन व्यवस्थापन ४० लाख, कोडवाडयावरील खर्च २० लाख, वृक्षारोपन तदनुषंगिक खर्च २० लाख, हिवताप प्रतिबंधक योजना ३५ लाख, कचरा डेपो सुधारणा व प्रकल्प उभारणी २ कोटी ५० लाख, मोकाट कुत्री व जनावरे बंदोबस्त १ कोटी १० लाख यासह इतर बार्बीवर खर्च करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे शासनाकडून प्राप्त विविध कामांसाठीच्या निधीची मनपा हिस्साची रक्कम भरणे प्रस्तावीत आहे. अमृत योजनेतील पाणीपुरवठा योजना, भुयारी गटार योजना, सोलर प्रकल्प, ग्रीम स्पेसेस इ. कामे तसेच घनचकरा संदर्भातील



डीपीआरमधील कामे, शहरातील चितळेरोड भाजी मार्केट जागा विकसीत करणे, नाटयगृहे बांधकाम पुर्णत्वास नेणे, तसेच शासकीय योजना पुर्ण करणे व शहरातील विविध भागांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

सध्या शहरातील कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनावर लक्ष केंद्रीत करून शहर वासियांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याबाबत दक्षता घेणेत येत आहे. तसेच कोरोना लसीकरण सुलभ होण्यासाठी उपाययोजना करणेत येत आहेत.

यावेळी आयुक्त श्री. शंकर गोरे , उपायुक्त श्री. प्रदीप पठारे , उपायुक्त श्री. यशवंत डांगे , मुख्यलेखाधिकारी श्री.प्रविण मानकर , नगरसचिव श्री. शाहजहान तडवी, लेखा विभागाचे श्री. अनिल लोंढे आदींसह स्थायी समिती सदस्य व खाते प्रमुख उपस्थित होते.

मा.सभापती साहेब :- नव्याने रूजू झालेले आयुक्त मा.श्री.शंकर गोरे यांचे स्थायी समिती तर्फे स्वागत करतो,मा.आयुक्त साहेब यांचा प्रशासकिय सेवेतील प्रदिर्घ अनुभव असून या अनुभवाचा शहरविकासाच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.तसेच मा.आयुक्त साहेबांना मी विनंती करतो की,त्यांनी या सभेमध्ये संपुर्ण अंर्थसंकल्पीय कामकाजामध्ये सहभाग घेवून सभा संपेपर्यत उपस्थित राहून आम्हाला मार्गदर्शन करावे.

उपस्थित सर्व मा.स्थायी समिती सदस्य, महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख व अधिकारी, पत्रकार बंधु व उपस्थित सर्वांचे हार्दिक स्वागत करतो.नुकतीच माझी मा.स्थायी समितीच्या सभापती माझी निवड झाली आहे.प्रशासनाने लगेचच स्थायी समिती मध्ये अर्थसंकल्प सादर करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला त्यानुसार आजची अर्थसंकल्पावरील सभा आयोजीत करण्यात आलेली आहे.प्रत्येक संस्थेमध्ये अर्थसंकल्प अत्यंत महात्वाचा भाग असून या माध्यमातुन शहराच्या प्रगतीचा आलेख आपल्याला उंचावण्याची संधी आहे.नुकत्याच झालेल्या निवडीने माझ्यावर शहर विकासाची मोठी जबाबदारी टाकण्यात आली आहे.

सर्व स्थायी समिती सदस्य व अधिकारी यांच्या सहकार्यातुन आपण सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करून,अर्थसंकल्पामध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या योजना तसेच शहराच्या सर्वांगीन विकास करण्याकरीता आपण मला सहकार्य कराल अशी खात्री बाळगतो.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे:- मा.सभापती साहेब आज सादर झालेल्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याकरिता सभा तहकुब करण्यात यावी.व उदया एक दिवसाचा वेळ देण्यात

यावा.उदया शुक्रवार दि.१९/०३/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. सभा सुरू करण्यात यावी.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे साहेब यांनी मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन देत आहे.

मा.सभापती साहेब :- महानगरपलिकेचे सन २०२१-२२ या वर्षाचे अंदाजपत्रक आपल्या अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त साहेब यांनी सादर केले आहे.अंदाजपत्रकाची माहिती दिली आहे.त्यावर मा.श्री.डॉ.सागर बोरूडे व सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे चर्चा करण्यासाठी उदया शुक्रवार दि.१९/०३/२०२१ रोजी सकाळी ११.३० वा. सभा पुढे सुरू होईल.सर्व खाते प्रमुख व शाखा प्रमुख यांनी सभे करीता आवश्यक त्या माहितीसह सभेस उपस्थित रहावे.

*-*-*-*-*-

**गुरूवार दिनांक १८/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वा सभा तहकुब झालेली सभा शुक्रवार दि.१९/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० सुरू करण्यांत आली.**

मा.सभापती साहेब :-सर्व प्रथम सर्व विभाग प्रमुख व खाते प्रमुख तर आहेत का ते नाहीत त्यांना बोलावून घ्या. काल तहकुब केलेली सभा सुरू करण्यात यावी.प्रत्येक विभाग प्रमुखाने लेखाशिर्षानुसार माहिती दयावी. लेखाशिर्षकानुसार वाचन सुरू करण्यात यावे.

मुख्यलेखाअधिकरी श्री.प्रविण मानकर:- आज आपण सन २०२१-२०२२ अंदाजपत्रकीय सभेकरीता उपस्थीत अहात.काल मा.आयुक्त साहेब यांनी स्थायी समितीस रूपये ६८४ कोटी ८९ लाखाचे चे अंदाजपत्रक सादर केले आहे.यामध्ये महसुली जमा ३०५.०५ गृहीत धरले असून महसुली खर्च रू.२५५.२४ कोटी इतका धरला आहे.मा.शासना कडून प्राप्त होणार अनुदान भांडवली जमा ३२५.२० व खर्च ३८५.७१ लाख इतका अपेक्षीत आहे.या नंतर मी लेखाशिर्ष निहाय तरतुदींचे वाचन करतो. पान नं. ३ महसुल जमा सर्वसाधारण करा पोटी रक्कम रूपये ४०.५०लाख अपेक्षीत असून एकुण कर रक्कम रूपये ५७०२ .०५ इतक गृहीत धरले आहे. अग्निमशन कर वसुल होत नाही. सन २०१९-२०२० मध्ये २६.१३ कोटी वसुल झाले आहे.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- अर्थसंकल्पामध्ये आपण तरतुद करतो पण तेवढी वसुली होत नाही.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- याला जबाबदार कोण, कागदावर बजेट करणार असे तर आपण नगरकांना काही देवू शकत नाही. आमच्या कडून तुम्हाला वसुली साठी

सहकार्य राहिल. वसुली लिपीकांना टार्गेट दया, वसुली झाली नाही तर जबाबदारी फिक्स करा उपायुक्त दर्जाचा स्वतंत्र अधिकारी दया.

मा.सभापती साहेब :- मुद्दा अगदी महत्वाचा आहे. जमा बाजुची सुरूवात कमजोर आहे. हा लिगली विषय झाला. ज्या मिळकर्तीच्या मनपा रेकॉर्डला आत्तापर्यत नोंदी लावल्या नाही.त्या लावण्यात याव्यात.त्यांची घरपटटी पाणीपटटी वसुल करण्यात यावी.

मा.श्री. रविंद्र बाररस्कर :- महानगरपालिकेच्या मालमत्ता हस्तांतरण करण्या करीता मालमत्ता खरेदीच्या १ टक्का नोंदणी फी आकारली जाते. ते उत्पन्न बुडते. प्रॉपटी सर्व्हे करताना हे पाहिले पाहिजे. प्रॉपर्टी हस्तांतरण करून घेतल्या पाहिजे. पालिकेच्या उत्पन्नात फार मोठा फरक पडेल.

मा.सभापती साहेब :- ज्या मालमत्तांची नोंद नाही त्यांची नोंद घेण्यात यावी. सध्या आपल्या कडे तीन सहाय्यक आयुक्त साहेत. यांच कडे जबाबदारी सोपविण्यात यावी.सन २००३ नंतर रिव्हीजनच झाले नाही.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- शेवटी याचा परिणाम बजेटवर होतो. ठेकेदार काम घ्यायला कोणी तयार होत नाही. त्यांचे बील मिळत नाही . आयुक्तांनी एक कार्यक्रम आखला पाहिजे.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मध्यंतरी मोजणीसाठी आपण एका एजन्सीला काम दिले होते. त्याची काय प्रगती आहे.

करसंकलन अधिकारी श्री.झीने :- सन २०१३ मध्ये स्टेसा लाईट कंपनीला नॉर्म नुसार काम देण्यात आले होते. त्यांनी २ वर्षात काम पुर्ण करायला पाहिजे होते. दिलेल्या मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्याने कंपनीस मुदतवाढ देण्यात आली. मुदतवाढ देवूनही काम पुर्ण न केल्याने त्यांचे काम रद्द केले.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ४ वर्षात काम पुर्ण करायला पाहिजे होते. ८-१० वर्ष त्यासाठी घातले. ९ वर्षात किती नुकसान झाले.

श्री.अंबादास साळी, सिस्टीम मॅनेजर :- अमृतमध्ये जीआयएस प्रणाली करणे आत्यावश्यक असल्या कारणाने सदर काम देण्यात आले होत .सधारण ६ वर्ष सलग काम चालू होते.अमत योजने अंतर्गत महत्वाचे असल्याने त्याला प्रत्येक वेळेस मुदत वाढ देण्यात येत होती.असे असतंना देखील सदर काम पुर्ण न झाल्यामुळे सदर संस्थेचे काम रद्द करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- काम बंद झाले तर आपण सोडून दिले का.

श्री.अंबादास साळी, सिस्टीम मॅनेजर :- प्रत्येक वर्षी आपला लिपीक मोजमाप करुन आणत असतो.

मा.सभापती साहेब :- वर्षानुवर्ष नविन बांधकाम चालू आहे.पण वसुलीत आउटपुट दिसत नाही.

मा.श्री.मुदस्सर शेख :- एक आदेश काढा.

मा.सभापती साहेब :- वारंवार सूचना देवूनही आउटपुट काही नाही. शहराच्या उपनगरात मालमत्ता करात वाढ झालेली दिसुन येत नाही. शासनाने नियुक्त केलेले उपायुक्त डांगे साहेब कार्यरत आहेत. या मुद्यासाठी त्यांची नेमणूक करावी. त्यांचे अधिनस्त एक टिम नेमावी त्यासाठी आवश्यक स्टाफची नेमणूक करण्यांत यावी.सहा महिन्यात रिव्हीजन करण्यात यावे.व स्थायी समिती समोर मांडण्या यावे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- २००३ मध्ये रिव्हीजन कसे केले.

करसंकलन अधिकारी श्री.झीने :-रिव्हीजन ऑफिसर,वसुली क्लार्क , मदतनीस यांची प्रत्येक वॉर्ड करीता नेमणुक करून रिव्हीजन करण्यात आले.त्या वेळी ७६ हजार प्रॉपर्टी सापडल्या होत्या. आजची नोंद १,५७,००० आहे. २००६ ला करंट डिमांड १८ कोटी होती. नगररचना विभागाकडून नोंदी घेतल्या जातात.

मा.श्री.सचिन शिंदे :- मी १० वेळा श्री झीने यांना माझ्या प्रभागातील मालमत्ता कराच्या नोंदी घेण्यास सांगीतले परंतु आदयाप नोंदी घेतलेल्या नाहीत.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :- वेळोवेळी मीटींगमध्ये मी सुचना दिल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- उपायुक्त श्री.डांगे साहेब यांच्या अधिनस्त टिम नेमण्यात यावी . १५ दिवसामध्ये कामाचा आढावा घेवू. कर्मचारी उपलब्ध करा. १५ दिवसात आढावा बैठक ठेवा. कर्मचा-यांनी त्यांच्या अडचणीही सांगाव्या. जर अडचणी नसेल व कर्मचा-यांनी कामात कूचराई केली तर कारवाई करण्यांत येईल. आपली जबाबदारी त्यांनी पार पाडावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- वसुली किती आहे.

करसंकलन अधिकारी श्री.झिने :- चालु वसुली ५४.७१ कोटी झाली आहे.एकुण थकबाकी १७८ कोटी आहे. एकुण मागणीच्या ५० टक्के वसुली झाली नाही.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- रिव्हीजन सातत्याने केली पाहीजे.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- मालमत्ता विभागाकडून नियमीत नविन बांधकामच्या नोदी घेणे बाबतचे काम सातत्याने चालू आहे. ८९-९० हजार घरे आहेत. २० ते २५ हजार ओपन प्लॉट, त्यांचे मालक सापडत नाही.ओपन प्लॉटवर झालेल्या बांधकामाची नोंद नाही.सप्लीमेंट असेसमेंट व्दारे नोंदी करतो. चालू वर्षी ४५ कोटी पैकी २९ कोटी वसुल झाले आहेत. चार प्रभाग निहाय पथक नेमले आहे. मालमत्ता धारक न्यायालयात गेलेले असून अशा २४०० केसेस सोडवण्यासाठी प्रयत्न चालू आहे. २३

तारखेला कोर्टात बैठक आहे. मोबाईल टॉवर्सला नोटीस दिल्या आहेत.मागच्या आठवडयात ३० लाख जमा झाले.

मा.सभापती साहेब :- सर्वसाधारण कर वसुलीमध्ये सक्षम अधिका-यांच्या नेतृत्वाखाली संपुर्ण मालमत्तांचे रिव्हीजन च्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये १५ टक्के वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे. मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे. या करीता लेखाशिर्ष मध्ये रू. ६० लाख तरतुद करण्यात यावी.

शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखांनी वाढ करण्यात यावी.

मा.श्री.सचिन शिंदे :- नगर शहरात अधिकृत टॉवर किती व अनधिकृत टॉवर किती.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :-२२३ टॉवरला असेसमेंट झाले.

मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोडच्या टॉवरवर कारवाई का केली नाही.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :- कारवाई अतिक्रमण विभागाने करावी.

मा. उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- नोटीस देवू.

मा.सभापती साहेब :- रिव्हीजनमध्ये सर्व विषय घेवू.

मा.श्री.सचिन शिंदे :- फलेक्स बोर्ड जाहिरात भाडे वाढ करा. किती अधिकृत,अनधिकृत किती.

मा.श्री.शेख मुदस्सर :- हा सर्व एकच विषय येणार.

मा.सभापती साहेब :- १५ दिवसाच्या आढावा बैठकीत हा विषय घेत आहे. कोर्ट मॅटरमध्ये २५०० केसेस आहेत. कोर्ट केसेस मुळे रू.८० कोटी अडकले आहेत. त्यावर आम्ही व मा.आ.संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेवून कायमचा मार्ग काढाण्याचा प्रयत्न करीत आहेत. गाळे धारकांचा प्रश्न मार्गी लावून उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न करणार आहोत.७०-८० टक्के मार्गी लावला आहे. २०१५ पासून विषय पेंडींग आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- रिव्हीजन मध्ये नोंदी करायच्या राहील्या, हे टक्केवारी नुसार सांगता येईल का.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- ८-१० टक्के असतील. ५०० च्या आसपास असतील.

मा.सभापती साहेब:- वाढीव बांधकाम केले त्यावर आकारणी होत नाही. तोही विषय होईल.

मा.श्री.शेख मुदस्सर :- अनधिकृत बांधकाम नियमीत करण्यासाठी जी.आर. आला आहे. त्यानुसार बांधकाम नियमीत करून दंड वसुली पासुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- नविन बांधकाम असेसमेंट खाली घेणे बंधनकारक आहे. अनाधिकृत बांधकाम रेग्युलराईज करण्याच्या बाबतीत नोटिफिकेशन आले आहेत.काही नागरीक त्यावर कोर्टामध्ये गेलेले आहेत.जे नियमाध्ये बसतात ते रेग्युलाईज करा.जे बसत नाही त्यांचे बाबतीत कोर्ट निर्यया नुसार करवाई करता येईल परंती आपण त्यांना टॅक्स सर्व लावू शकतो.

मा.सभापती साहेब :- नगर शहर टपरी मार्केट होत चालले आहे. ते पण रिव्हीजन मध्ये घेवून कसे करता येईल ते पहा. अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.१ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.. मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टींची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

"गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ६ लाख वाढ करण्यात यावी.

मा.श्री.शेख मुदस्सर :- झोन वाईज सर्व्हे करा.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- १ एप्रिल पासून कारवाईचा मोठा ड्राईव्ह येणार आहोत. यावर्षी आतापर्यंत ३० कोटी वसुल केले. कर्मचा-यांचे अभिनंदन केले पाहीजे. कोव्हीड जन्य परिस्थिती असतानाही वसुल झाले आहेत.

मा.श्री.शेख मुदस्सर :- शास्ती माफी मुळे वसुल झालेला आहे.

मा.श्री.भागानगरे प्रकाश :- आमदार साहेबांनी भुमिका घेतली. शास्ती माफी करणे बाबत.

मा.श्री.शेख मुदस्सर :- रू ३० कोटी पैकी शास्ती माफी नंतरचा आकडा किती आहे.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :- ३४ कोटी शास्ती माफी मुळे मिळाले, थकीत रक्कम जादा असल्याने टक्केवारी वाढत नाही.

मा.सभापती साहेब :- कर्मचा-यांचे अभिनंदन करतो ज्या झोन मधून वसुली जादा होईल त्या कर्मचा-यांचा गौरव सुध्दा करु. यापुढे रिझल्ट दाखवावा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- शास्ती माफी देवूनही रक्कम वसुल भरलेली नाही. अशांवर कारवाई करा.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- ४५० जप्ती वारंट काढले आहेत. आजपर्यंत शक्य नव्हते ते आपण केले.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :- १५० कोटी मागील बाकी आहे.

मा.सभापती साहेब :- अधिका-यांना जबाबदारी द्या. दर १५ दिवसांनी आढावा बैठक घेण्यांत यावी.

अर्थ विभाग श्री.अनिल लोंढे :- यापुर्वी मोहीम राबवतांना ज्या कर्मचा-याने जादा वसुली केली. त्याला ५००१ रुपयांचे पहिले बक्षीस दिले जायचे ,ती योजना राबवली तर वसुली जादा होईल.

मा.श्री.भागानगरे प्रकाश :- वसुली करण्याकरीता कायदेशीर मार्गाने जे जे करता येईल.ते सर्व करा.

अर्थ विभाग श्री.अनिल लोंढे :- तरतुद आहे.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- प्रभाग वाईज चार बक्षिस देवू. पहिले बक्षीस रूपये २१०००/- दुसरे बक्षीस ११,०००/- तीसरे बक्षीस रूपये ५०००/- असे चार झोन मिळून १२ कर्मचा-यांना बक्षीस द्यावे लागेल.

नगरसचिव श्री.तडवी :- या पुर्वी मा.संजय काकडे आयुक्त असतांना प्रभाग अधिकारी यांना १५ हजार कर निरीक्षक १० हजार वसुली लिपीक ५ हजार असे बक्षीस योजना राबविण्यात आली होती.

मा.सभापती साहेब :- बक्षीसाच्या रकमे बरोबर सन्मान चिन्ह,सन्मान पत्र सुध्दा देण्यात यावे.

मा.श्री.मनोज कोतकर :- डांगे साहेबांनी जी सूचना मांडली ती अंतिम करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- गाळा भाडे, फलेक्स वसुलीसह सर्व वसुली येईल. शास्ती सोडून जी वसुली होईल त्यांना बक्षीस देण्यांत यावे.

मा.श्री.सागर बोरुडे :- जिल्हाधिकारी कार्यालया शेजारी पराग बिल्डींग आहे. ही रेव्हीन्यु सोसयटीची बिल्डींग असून यामध्ये त्या बॉड रायटर यांना तीस हजार रूपये भाडयाने त्यांनी दिली आहे.तसेच शेजारील जागा पार्कीग साठी भाडे तत्वावर देण्यात आली आहे.मा. उपायुक्त यांना वसुली करण्याकरीता सांगीतले. गाळे भाडयाने दिले. मोकळी जागा पे-ॲण्ड पार्कने देतात. आपल्याला नॉमिनल भाडे देतात.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- आपण रिव्हीजन करुन घेवू.

मा.सभापती साहेब :- सगळाच विषय घेवू.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- तुमचा फोन आल्यानंतर मी झीने यांना सांगीतले होते .

मा.श्री.डॉ.सागर बोरुडे :- नगर शहरामध्ये खाजगी तत्वावर पे ऑण्ड पार्क आहेत. आपल्याकडे त्याच्या नोंद नाही. मार्केट विभागालाही माहित नाही. जुन्या सिव्हील हॉस्पीटल मधील पे ॲण्ड पार्क ची नोंद नाही. तिथे पार्किग व्दारे लाखो रूपयंचे उत्पन्न कमावतात.

मा.सभापती साहेब :- आपला काय रोल आहे.

मा.उपायुक्त श्री.यशवंत डांगे :- असेसमेंट करा.

मा.सभापती साहेब :- शहरामध्ये ब-याच ठिकाणी अनाधिकृत रित्या पे ॲण्ड पार्क चालू आहे.यांची शोध मोहिम हाती घेण्यात यावी." पे ॲण्ड पार्क "या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

मुख्यलेखाअधिकरी श्री.प्रविण मानकर :- पान नं.६ वरील मनपा मालमत्ता व उपयोगीता सेवा यांचे पासुन मिळालेले उत्पन्न अ.क्र.१ ते ४५ चे वाचन केले.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ज्या गाळ्याचे गाळा भाडे थकीत असे गाळे सील केले का? नोटीस देवून पुढची प्रक्रिया करायला पाहीजे.ॲग्रीमेटमध्ये तशी तरतुद आहे.

मा.उपायुक्त श्री. डांगे :- २००७ साली ५ हजार होते. सन २०१७-१८ मध्ये २० हजार भाडे झाले.गुणोत्तन न लावता भाडे वाढ झाली.या भाडेवाढीस व्यापा-यांचा आक्षेप आहे.त्यामुळे ते नियमीत भाडे भरत नाही.व्यापाराची परिस्थिती नाही. दोघांचे दृष्टीने कायेदशीर दृष्या भाडे निश्चित करू.

मा.श्री. मुदस्सर शेख :- गाळे धारकांची पटटी वसुल करायला पाहिजे.

मा.उपायुक्त साहेब श्री.डांगे :- पटटी नगण्य आहे. जुन्या दराप्रमाणे भरण्यास तयार आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- जे पटटीच भरत नाही. अशा गाळे धारकांवर कारवाई करा.

मा.सभापती साहेब :- १५ दिवसात तोडगा निघणारच आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- जुने गाळे काही सील केलेले आहे.असे गाळे मालकाची कॅपिसिटी नसेल तर अशा गाळयंची फेरनिविदा काढण्यात यावी. उत्पन्नात वाढहोईल.

मा.श्री. सागर बोरूडे :- ब-याच गाळयांमध्ये पोट भाडेकरू आहे. मुळ मालकानं प्रति महिन्याला रूपये ३०-४० हजारांनी भाडयाने दिले आहेत.मार्केटरेटने भाडे लावले आहे. तिथे रेडी रेकनर रेट नुसार लावले तर उत्पन्न वाढेल. एरीया वाईज असेसमेंट करा. ८० लाखाला गाळे विकत घेतात.जीथे शक्य आहे तेथे वाढ केली तर बरे होईल.

मा.सभापती साहेब :- पोट भाडेकरीकडून जादा भाडे घेत असेल तर ती माहिती घ्यावी.त्यावर करावाई करू.

मा.श्री. मुदस्सर शेख :- मुळ मालक असेल तर तडजोड करावी. पोट भाडेकरू असेल तर नियमाप्रमाणे भाडेवाढ करावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- गाळे हस्तांतर बाबत माहिती दया.

मार्केट विभाग प्रमुख श्री.वाळेकर :- रेडी रेकनर नुसार भाडे आकारणी करण्यास दि.३१/१/२०१५ रोजीच्या मा.महासभेने मान्यता दिली आहे. जुन्या मालकाडून नुतनीकरण करून घेतलेली प्रस्ताव क्र.३ २०/३/२०१८ विशेष सर्वसाधारण सभा मी ३ दिवसांपुर्वी चार्ज घेतला आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- आतापर्यत किती गाळे हस्तांतर झाले

मा.श्री. मुदस्सर शेख :- त्यांनी ३ दिवसापुर्वी चार्ज घेतला आहे.माहिती मागविण्या करीता लेखी पत्र दया.

मा.सभापती साहेब :- नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. या लेखाशिर्षा मध्ये रू.७ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.गाळे हस्तातंरणाची प्रक्रिया प्रभावीपणे चालू असल्याने रू. २५ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.नोटिस फि / शास्ती या लेखार्शिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ७५ लक्ष ने वाढ करण्यात यावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- जाहिरात बोर्ड बाबत माहिती दया.

जाहिरात विभाग लीपीक श्री. सुबोध देशमुख :- खाजगी जागेत ४६६ बोर्ड , पालिका हददीत २७ बोर्ड ,४०x१० परवानगी , इलेक्ट्रीक पोलवर ३४४ बोर्ड लावले आहेत

मा.श्री. शाम नळकांडे :- उपनगरात किती तरी अनधिकृत बोर्ड आहेत.

श्री. सुबोध देशमुख :- ५ रू. स्वे.मी. दराने आपण आकारणी करतो.

मा.श्री. शाम नळकांडे :- दिल्लीगेटचा बोर्ड ५०x२०

श्री. सुबोध देशमुख :- ४०x२० ची परवानगी देतो.

मा.श्री. शाम नळकांडे :- किती बोर्ड

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ४०x२० च्या वर काय कारवाई करतो ती करा काही घटना घडली तर त्याला जबाबदार कोण रहील.

मा.श्री. सचिन शिंदे :- ज्यांना परमीशन नाही त्याना दंड करा.

मा.श्री. मुदस्सर शेख :- रस्ता बाजू फी मागचे टेंडर रद्द झाले आहे. निविदा प्रसिध्द करा. संपुर्ण शहरा साठी एकत्र निविदा न करता झोन वाईज निविदा प्रसिध्द करा.एकच निविदा केल्यास त्याने काम बंद केल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नवर परिणाम होतो.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने नियम बसविणे आहेत.आकाशचिन्हाची नियमावली मनपामध्ये लागु केली तर वसुली होईल एप्रिल, मे मध्ये पॉलीसी ॲडॅप्ट करू.स्थायी समितीसमोर विषय घेवू.

मा.सभापती साहेब :- "जाहिरात बोर्ड जागा भाडे " या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १२ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.पुढचा विषय घ्या.

मा.श्री. सागर बोरूडे :- शुभेच्छांचे बोर्ड लावतात त्यांचेकडून वसुली करावी..

मा.उपायुक्त श्री. डांगे :- वसुली खाजगीकरण करू.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- मनपा शाळापासून मिळणारे अपेक्षीत उत्पन्न तरतुद २० लाख.स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन १० लाख तरतुद करण्यात आलेली आहे.

मा.सभापती साहेब :- मनपाच्या शाळा किती , किती भाडयाने दिल्या.त्यापासुन किती उत्पन्न मिळते.

मार्केट विभाग प्रमुख श्री.वाळेकर :- मनपा शाळोची संख्या ,७ असुन त्यामध्ये खोल्या ८२ आहेत.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- सांगळेगल्ली समोरील महानगरपालिकेची शाळा भाडयाने दिली आहे.

मनपा शिक्षण मंडळ श्री. पवार :- १२ शाळा चालू आहेत. त्यामध्ये ८३७ विदयार्थी आहेत पुर्वीच्या बंद असलेल्या शाळा भाडयाने दिल्या.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- माध्यमीक शाळा बंद झाली आहे.अर्धवट माहिती देता.

मनपा शिक्षण मंडळ श्री. पवार :- ती शाळा मनपा चालवित होती.तत्कालीन शिक्षण मंडळ असतांना १२ शाळा होत्या.एक शाळा पालिका फंडातून चालू होती.या माध्यमीक शाळेतील मुख्याध्यापक ,शिक्षकांना मान्यता नव्हती.

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- माध्यमीक शाळेच्या तुकडयांना मान्यता होती. शिक्षकांच्या पदांना मान्यता नव्हती. शिक्षन मंडळ सभापतींनी प्रोसिजर न राबवता भरती केली.सदरच्या पदांना मान्यता नसलयाने त्यांचे वेतन मनपा फांडातुन येवू शकत नव्हते.मनपास्तरावर पदनिर्मीती करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते.पदनिर्मीती न झाल्यामुळे मनपा मध्ये सदर शिक्षकांचा पगार काढता येत नव्हता.मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार संबंधित शिक्षकांचे त्यांनी काम केलेल्य कालावधीतील वेतन रू.९७ लाख अदा केले आहे. ान्यता तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आली होती. पदनिर्मीती साठी शासनाला प्रस्ताव पाठवावा लागेल.शासन ज्यावेळेला मान्यता देईल त्यावेळी विषय होईल. आपल्या दृष्टीने हा विषय संपला आहे.

मा.श्री. मनोज कोतकर :- काही शाळा मोडकळीस आहे.कागदोपत्री काही ठिकाणी विदयार्थी दाखवितात. काही शाळा मोडकळीस आलेल्या आहेत.जर या शाळा खाजगी संस्था घेत असतील तर भाडेतत्वावर देवून टाका.

मा.सभापती साहेब :- जिथे तुम्हाल शंका वाटते तेथे व्हिजीत करू व नंतर निर्णय

मा.उपायुक्त साहेब :- काही संस्थांना दिल्या आहेत.

मा.श्री. मनोज कोतकर :- धनंजय जाधव यांचे शेजारी मनपा ची शाळा आहे.तील कुलुप आहे . तिथे काही तरी करा.

मा.सभापती साहेब :- तिथे कुलूप आहेत. तिथ पॉझिटीव्ह थिंकींग ठेवून, काय  करता येईल ते पहा. सगळाच विषय घ्या. शाळा परत चालू करता येते का ते पहा.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- सर्व्हे व्हायला पाहिजे.  रेकॉर्ड करून घ्या.

मा.सभापती साहेब :- उत्पन्नाच्या दृष्टीकोनातून विचार व्हावा.

मा.श्री. सागर बोरूडे :- एक कमिटी नेमा.पटसंख्या किती ?

मा.सभापती साहेब :- सर्व्हे करा.आढावा  बैठक घेवू. प्रोसिडिंग  मध्ये नोंद घ्या.

मा.श्री. मनोज कोतकर :- पुढच्या वर्षी हा विषय मिटींग मध्ये निघाला नाही पाहीजे.

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- मनपाच्या प्रॉपर्टीची नोंद नगररचना कडे असते.

नगररचना श्री.चारठाणकर  :- नोंद नाही, खुले  भुखंड, रस्ते,  याची नोंद आहे.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- आपले जर रेकॉर्ड झाले तर आपली मनपा श्रीमंत होईल.

मा.सभापती साहेब :- भाडेतत्वावर दिलेल्या शाळाखोल्यामधील थकबाकीदारांवर कडक करावाई करण्यात येवून तसेच बंद असलेल्या शाळा खाजगीकरणाच्या माध्यमातुन चांगल्या शैक्षणीक संस्थांच्या मागणी नुसार भाडेतत्वावर देण्यात याव्यात जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल "मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न "या लेखाशिर्षातंर्गत  रू.२५ लाखाची वाढ करण्यात यावी.बेग पटांगणवर रिझार्वेशन काय आहे.?

नगररचना विभाग ,उपअभियंता श्री.बल्लळ :- शॉपिंग कॉम्प्लेक्स चेआहे.आकिलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडियाचे आदेशा नुसार घोषीत ऐतिहासीक वास्तुचे १०० मीटर च्या आत बांधकाम परवानगी मिळत नाही.

मा.सभापती साहेब :- याकरीता स्वतंत्र्य अधिका-याची नेमणूक करा. त्याने ठरावीक मुदतीत कार्यवाही करावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- मिळकत व्यवस्थापन अधिकारी हे पद निर्माण करावे.इतर मनपामध्ये हे पद आहे.

मा.उपायुक्त श्री. डांगे  :- नगररचनाकार यांचेकडे ही जबाबदारी  देवू.

नगररचना श्री. बल्लाळ :-  रिटार्यल तहसीलदार यांचेकडून आपण नोंदी चे काम करून घेते.अधिक्षक मिळकत व्यवस्थापक हे पद आकृतीबंधामध्ये  बांधकाम विभागाकडे मंजूर आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- सध्या आपल्याकडे तीन सहाय्यक आयुक्त आहेत. त्यांचेकडे जबाबदारी देता येईल.

मा.सभापती साहेब :- कालावधी ठेवा.

मा.श्री. मनोज कोतकर :- मागील मिटींग मध्ये भंगार साहित्य लीलाव करणे कामी  त्रिसदस्यीय समिती ची निवड करण्यात आली होती.त्याचे पुढे काय झाले.

मा.सभापती साहेब :- आयुक्त साहेब यांनी एक अधिका-यावर जबाबदारी दयावी.

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- तांत्रिक मनुष्यबळ लागेल. नगररचनाकार पाहतील

नगररचनाकार श्री. बल्लाळ :- आकृती बंधामध्ये बी.ई. सिव्हील ,एल.एल.बी.अशी शैक्षणीक पात्रता दिलेली आहे.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- बल्लाळ यांना प्रमुख करू.बाकीचा स्टाफ मदतीला देवू.

मा.सभापती साहेब :- पब्लीश करा. " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५० लाखाने वाढ करण्यात यावी." बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये रू. १० लाख रूपयांनी वाढ करावी. "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रू.२५लाखने वाढ सुचविण्यात येत आहे.

मा.श्री.डॉ.श्री.सागर बोरुडे :- कोतकर साहेबांनी सुचविल्या प्रमाणे ज्या संस्था शाळा चालविण्यास घेण्यास इच्छूक आहे.त्या संस्थेला देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- टि.डी.आर.च्या माध्यमातुन काही मोक्याच्या व विकसीत करता येतील अशा जागा महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आहेत. अशा जागेचा सर्व्हे करून त्या जागा विकसीत करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावेत.

शिक्षण मंडळ श्री.पवार, :- आदर्शनगर शाळेचा पट २२ आहे. शाळा हस्तांतरणासाठी शासनाकडे परवानगी मागावी लागेल. .शाळा हस्तांतरण करण्यासाठी मा.महासभेचा ठराव घेवून प्रस्ताव शासनाकडे पाठवावा लागेल. शिक्षकांचा पगार संस्थेला द्यावा लागेल. संस्थेने संपर्क केला पण शिक्षकांचे वेतन देण्यास नकार दिला.तसेच विदयार्थी समाविष्ट करण्यास नकार दिला

मा.सभापती साहेबः- डांगे साहेब, चर्चा करा.

मा.श्री.शाम नळकांडे :- स्पर्धा परिक्षा केंद्र चालू आहे का? त्या ठिकाणावरून आनेक विद्यार्थी घडतील. स्पर्धा परिक्षा बंद असेल तर चालू करा.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- प्रसिध्दी विभागाचा चार्ज दिलेला नाही. आजच ऑर्डर काढण्यांत येईल.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- कोव्हीड मुळे २० पेक्षा जास्त एकत्र येवू नये अशा स्वरूचे निर्बध असलयाने स्पर्धा परिक्षा केंद्र बंद आहे. ऑनलाईन पध्दतीने अभ्यास करू शकतात.परिक्षेचे स्वरुप बदलले आहे.

मा.सभापती साहेब :- परत चालू कसे करता येईल ते पहा. या दृष्टीने प्रयत्न करण्यांत यावेत. पान नंबर ९ चे वाचन

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- अनुदाने अंशदाने तरतुदींचे वाचन करण्यात आले..

पान नंबर १० संकीर्ण,तरतुदींचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.डॉ.सागर बोरुडे :- २२ नंबरवर घनकचरा संकलन व वाहतूक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्न या लोखाशिर्षावर मी घनकचरा संकलन व वाहतुक बाबत एक पत्र दिले होते. पुर्वी एस आय लोकांना एक ॲप दिले होते. लोकेशन करीता जी.पी.एस प्रणाली बसविण्यात आली. परंतु ती बंद अवस्थेत आहे. कचरा जेवढा जमा होतो. तो खाजगी काटयावर मोजला जातो. कच-याच्या वजनाबाबत संषय आला आहे. विनंती की, जीपीएस यंत्रणा ॲक्टीवेट करावी. भिंगार हद्दीतुन आपल्या महानगरपालिकची कचरा गाडी कचरा उचलतांना आढळून आली आहे. आयुक्तांनी यंत्रणा डोळयाखालून घालावी.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- १ फेब्रुवारी पासुन जीपीएस ॲक्टीवेट केली आहे.नविन वजन काटा घेण्याकरीता जी.एम.पोर्टल वर ऑर्डर झाली आहे. वजन काटा १५-२० दिवसात बसून घेतो. खाजगी वजनकाटयावर मी व आयुक्त यांनी अचानक पाहणी केली. तेथील कर्मचारी आम्हाला ओळखत देखील नव्हते.आमच्या पहाणीत बोगस वजन होतांना आढळून आले नाही.तशी गाडी जर दिसली तर आपण सुचना केली तर परवानगरी शिवाय खाली करू नका आशा सुचना केल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- आपण जर त्याला धरले तर तो वजन कमी करील .दंड करण्यात यावा.

मा.उपायुकत श्री.डांगे :- आपण दंडात्मक कारवाई करू.

मा.श्री.शाम नळकांडे :- प्रतिमहिना भाडे वजावट करून देयक अदा करणे आवश्यक असतांना वजा न करता देयक अदा केले आहे. आपण वजनकाटा पैसे असतांना बसवू शकत नाही. ही मोठी शोकांतिका आहे.मुळ निविदेत ठेकेदार स्वत:चे वाहन वापरेल असे असतांना ठेकेदाराला ६० घंटा गाडया वापरायला दिल्या आहेत.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- निविदेत प्रति महिना भाडे वजावट करावयाचे अशा तरतुदी नुसार आर.टी.ओ.चे एक परिपत्रकानुसार ठेकेदाराकडून २४ हजार रूपये आकारणी केली आहे.परंतु ज्यावेळी गाडया दिल्या त्यावेळी २४ हजार रूपये घेणे अपेक्षीत होते.गाडी बरोबर ड्रायव्हर देणे आवश्यक असते.ड्रायव्हरचे मानधन १४ हजार कमी करून वसूल करणार.जाने.फेब्रु चे वसुल केले.येथुन पुढील वसुल करू.

मा.श्री.राम नळकांडे :- ३१/०८/२०२० पासुन आपल्याला कॉम्प्टॅक्टर चे प्रति महिना रूपये ६० हजार भाडे ठेकेदाराने दिले नाही.

मा.श्री.शाम नळकांडे :- मार्च ८३ लाख, एप्रिल ७३ लाख मे - ७७ लाख जुन - ७६ लाख अदा केले आहेत.कोरोना काळात संपूर्ण शहर बंद असतांना एवढा कचरा आला कसा.भाजीबाजार बंद होते.घरोघर कचरा संकलन बांद होते.लॉकडाउन मध्ये बाजार पेठा व हॉटेल व्यवसाय बंद होते.रोज १४० टनांच्या पुढे कचरा जमा होत नसतांना

सुध्दा सरासरी प्रमाणे कच-याचे बिल अदा करण्यात आले.कॉम्पॅकटरच्या माध्यमातुन ४ लाख वसुल केले आहे. यावर कोठेतरी अंकुश ठेवा. शासन निर्णयाची दिशाभुल केली आहे. प्रभाग अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांची पहाणी अहवालावर स्वक्षरी असणे बाबतची १ नंबर अट आहे.त्यांचा अहवाल नसतांना बिल अदा केले आहे.हे खरे आहे का ?

मा.उपायुक्त श्री.डांगे :- प्रभाग अधिका-यांच्या सहया आहेत.

मा.सभापती साहेब :- तत्कालीन वैदयकीय अधिकारी यांनी माहिती दयावी.आरोपामध्ये तथ्य आहे. लॉकडाउन असताना एवढा कचरा येतो कोठून.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :-अगोदर व मागच्या महिना किती कचरा उचलला याची माहिती दया.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- २०१९ नोव्हेंबर मध्ये १४-१५ दिवस काम केले. त्यानंतर स्वच्छ सर्व्हेक्षण मोहिम डिसेंबर ,जानेवार,फेब्रुवारी मार्च मध्ये राबविण्यात आली. लॉकडाउन २२ ,२३ मार्च ला झाला.मार्च पर्यत कोव्हीड नव्हता ज्यावेळेस आपण ठेका दिला त्यावेळी ५०० टनाचे कच-याचे ढिगारे होते. उदा. अमरधाम जवळील ढिग होते. मा.आमदार संग्राम भैय्या जगताप साहेबांनी तक्रार केली होती . रस्त्याच्या बाजुला ढीग होते.अप्पू हत्ती चौक जवळ ढिग होता.कित्तेक दिवसांपासूनचा कचरा साठला होता. जिथे जिथे कचरा दिसेल तो उचलणे बाबत .मा.जिल्हाधीकारी यांच्या सुचना दिल्या होत्या. त्याचे बिल आपण अदा केले आहे.

शहरात दैनंदिन कचरा १५०-१६० मे.टन कचरा निर्माण होते व्यापारी पेढा बंद होत्या तरी घरातुन कचरा निर्माण होत होता.या बाबत सामाजीक कार्यकत्यांनी तक्रार केली. त्याचा अहवाल मा.आयुक्त साहेबांकडे समितीने सादर केला आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- समिती बाबत मी आक्षेप घेतला आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- त्या चौकशीचे प्रमुख मा.श्री.दिनेश सिनारे होते.चौकशी समितीमध्ये मी सदस्य होतो.सदस्याचे काम समितीस आवश्यक ते कागदपत्र सादर करणेचे होते.

मा.श्री. शाम नळकांडे :- आपला कचरा घरा पेक्षा बाजारपेठेतुन जास्त जमा होते. हा घरगुती कचरा नाही. एक गाडी दिवस भरत घरगुती कच-यातुन भरते. माझे म्हणणे चुकीच्या पध्दतीने बील अदा केले आहे. वाहन भाडे आतापर्यत वसुल केलेले नाही .वाहन पार्किंगचे भाडे लावणे बाबत ई - निविदेत तरतुद आहे. आपण त्याला जागा दिलेली आहे. आजपर्यत ठेकेदाराकडून वाहन भाडे का वसुल केले नाही. भाडयाने दिल्यानंतर वाहन कोठे लावायची ही त्याची जबाबदारी.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- अशा पध्दतीने कुठल्याही माल प्रॅक्टीसेस होत नाही.वजनाच्या बाबतीतआपण चेक करू.लॉकडाउन मध्ये मागच्या दाराने ॲक्टीवीटी चालू होत्या. प्रशासना विरूध्द संशयाचे वातावरण निर्माण करू नका डिसपुट आहे तो सोडविला पाहिजे. आपल्याला कुठेतरी वाहन पार्क करावे लागणार.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- तुमचे पत्र आल्यानंतर मी अभ्यास केला. भाडे घेते गरजेचे आहे. अंमलबजावणी होणे गरजेचेआहे. निविदेतील अटी कॉम्लीकेटेड आहे. निविदा काढतांना काही गोष्टी स्पष्ट नमूद करणे.उदा. ड्रायव्हर सह घेणे ,डिझेल घेणे याचा उल्ले्ख नव्हता.आम्ही RTO शी चर्चा केली वाहन घेणे बाबत या अटी आहेत . उदया मला ते क्लेरीफिकेशन करतील सुरवातील ५ लाख कपात करण्यात आले आहेत. क्लेरीफिकेशन आल्यानंतर कपात करू.

मा.श्री. शाम नळकांडे :- सर्व जनतेचा पैसा आहे.अर्टीशर्तीचा भंग करता.

मा.सभापती साहेब :- क्लॉज नसता तर ते ही बोलले नसते.

मा.उपायुक्त श्री. डांगे :- मार्च एण्ड पर्यत कॉम्पॅक्टर व घंटा गाडया याचे वाहन भाडे वसुल करू. पार्किंग बाबत डिस्पुट आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- ई - निविदेत स्पष्ट उल्लेख आहे. वाहन पार्किंगचे भाडे घेण्यात येईल. स्थायी समिती इतिवृत्तात उल्ले्ख आहे. भाडयापासून २ ते २.१५ कोटी मिळतील असा उल्लेख आहे.निधीचा दुरूपयोग होवू नये.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- कोणतीही निविदा आउटपुट बेसीसवर काढायची नसते. ही चुक म्हणून राहत नाही .पुढे काम करावे लागणार आहे. प्रति घर निविदा काढायला पाहिजे होती.कचरा आउट बेसीस कर उचलायला पाहिजे, तो आपल्या निविदेत उल्लेख नाही.

मा.श्री.शाम नळकांडे :- ठेकेदाराकडून संपुर्ण पैसे वसुल करण्यात यावे. निविदेस जो काही बदल करता येईल तो करावा.

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- मनपाच्या दृष्टीने हि निविदा फायदेशीर आहे.२००६ साली प्रतिदिन प्रतिघर सहा रूपये दर होता. आपल्याकडे १ लाख घरे धरली नउ रूपयांप्रमाणे महिन्याच्या आसपास ९० लाख व्हायला पाहिजे.आम्ही सर्व दृष्टीने अभ्यास करून सहया करतो. मागे ज्या चुका झाल्या त्यादुरूस्त करून पुढे जाण्याचा प्रयत्न करतो.

मा.श्री. शाम नळकांडे :- मनपाचा आर्थिक नुकसान होत असेल तर आम्हाला प्रश्न विचारणाचा अधिकार आहे का नाही. ८२ लाखांचे बील निघते.

मा.सभापती साहेब :- मार्च एण्ड पर्यत वसुल करू असे उपायुक्त यांनी सांगीतले आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- बील दयायला चालू केल्यापासून ज्या एस.आय.व प्रभाग अधिकारी त्यांच्या सहया होत्या त्या एस.आय.व प्रभाग अधिकारी यांना मिटींग संपल्यानंतर बोलावून लेखी घ्या. आतापर्यत ऑडीटर ने घेतलेले आक्षेप याची माहिती दया.

मा.सभापती साहेब :- हॉस्पीटल व दवाखाने यांचे कडून जैव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २ वर्षानी त्यामध्ये १० टक्के दरवाढ होणार असल्याने या पासुन मिळणा-या उत्पन्नामध्ये जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ३० लाखांनी वाढ करण्यात यावी.

खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक खाजगी तत्वावर चालू असल्याने ठेकेदारास मागील व चालू वर्षी खरेदी केलेल्या गाडया ठेकेदार संस्थेस भाडेतत्वावर दिल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.तसेच ठेकेदार संस्थेबरोबर झालेल्या करारानुसार उपलब्ध असलेल्या वाहनांच्या पार्कीग करीता दिलेल्या जागेचे भाडे आकरण्यात यावे.

मा.श्री. सागर बोरूडे :- महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळाने नोटिस दिली.४० टन कचरा आजुबाजूच्या शेतामध्ये टाकला.त्यावर प्रक्रिया केली नव्हती.३१ डिसेंबरला तत्कालीन आयुक्त यानी घेतलेले निर्णय जिल्हाधिकारी तथा आयुंक्त यांनी रद्द केले आहेत.असे असतांना बील अदा केले आहे. बायोमायनिंगचा ठेका ३ कोटींचा दिला .त्यावर प्रक्रिया केली नाही. घाईघाई मध्ये १ कोटीचे बील अदा केले. वांरवार जर असे घडले तर नुकसान होईल.मनपाचे उत्पन्न वाढले पाहिजे हरीत लवादाने प्रत्येक महिन्यात मनपास ४० लाख दंड केला आहे. एस.टी.पी.प्लॅन्ट उभारला नाही तर पुन्हा MPCB दंड करेल.आपण वसुली करायची व लोकांच्या घश्यात घालायची

मा.श्री. सागर बोरूडे :- निधी उपलब्ध नसल्याने प्रभागात कामे होत नाही पुन्हा दंड केला तर यापेक्षा भयानक गोष्ट नाही. एक,एक रूपयांसाठी आपण भांडतो.

मा.सभापती साहेब :- दंड लावण्याची वेळच आली नाही पाहिजे.

मा.श्री. सागर बोरूडे :- ४० टन कचरा बायोमायनिंग न करता शेतात टाकला.त्याचे बील का अदा करण्यात आले.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- १ मे.टन जुना कचरा होतो . खत निर्मितीची विल्हेवाट लावली ज्याच्या शेतात खत टाकले ,त्याची तक्रार नाही . ज्या ठिकाणी कचरा टाकला ा त्या शेत करण्याची तक्रार नाही. MPCB ने आपल्याला कळविले नाही.

मा.श्री. सागर बोरूडे :- मा. जिल्हाधिकारी साहेब यांनी आदेश देवूनही बील अदा केले. प्रक्रिय न करता कचरा टाकला तर दंड करा. माहिती घ्यावी व करवाई करावी

मा.सभापती साहेब :- माहिती दया.

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- मा.जिल्हाधीकारी तथा आयुक्त यांनी तत्कालीन आयुक्त यांनी केलेल्या बदली आदेशाला स्थगिती दिली होती .बील अदा करण्यास स्थगिती नव्हती.तसेच शेवटच्या दिवशी जे अधिकार प्रदान केले होते त्याला स्थगिती होती.या बाबत अहवाल सादर करणे बाबत आदेशीत केले नुसार सर्व विभागांना अवगत करून अहवाल सादर करण्यास कळविण्यात आले होते.

मा.श्री. सागर बोरूडे :- त्याच्याकडून प्रक्रिया करून घेण्यात यावी.मगच बील अदा करावे.

मा.उपायुक्त श्री. डांगे :- ७ नाल्यासाठी ३५ लाख दंड केला आहे.सुप्रीम कोर्टात अपिल करणार आहोत.सात नाल्याला इंटरसेक्टर करणार आहोत.एस.टी.पी. ७०% झाले आहे. सर्वसाधारण STP ५७ एम एल डी चा जुन अखेर चालू करण्याचा प्रयत्न आहे. ३ महिन्यात प्रकल्प चालू करू.

मा.श्री. सागर बोरूडे :- जुन्या वाहनांची विल्हेवाट लावणार का? वाहने पडून खराब होतील.

मॅके.इंजि. श्री. निकम :- मो.व्हेईकल कडून लिलाव प्रक्रियेसाठी RTO ला पत्र दिले आहे.त्यांच्या कडून दर प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवू.

मा.उपायुक्त श्री. डांगे :- त्यांच्याकडून आले नाही तर प्रायव्हेट व्हॉल्युअर कडून व्हॅल्युएकशन करून घ्या.

मा.शाम नळकांडे :- एस.एच.१६ टि.२६७ डंपर प्लेसर वाहन ठेकेदाराला दिलेले आहे की आपल्याकडे आहे.

मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री.देशमुख :- आपल्याकडे आहे.

मा.श्री. मनोज कोतकर :- मनपाच्या स्क्रॅपसाठी एक समिती नियुक्ती झाली होती.आपला हा विषय झाला . त्याचे पुढे काय झाले. या रकमेतुन अग्निशमन वाहन घेता येईल.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- सर्व विभागांकडून माहिती मागवली आहे.दोन वेळा स्मरण पत्र दिले आहे. काही विभागांचा माहिती अप्राप्त आहे.

मा.श्री. मनोज कोतकर :- विळद पाण्याच्या टाकीवर बरेच मटेरियल पडले आहे.

स्टोअर विभाग प्रमुख श्री. जाधव :- विदयुत विभागाचे जास्त मटेरियल आहे.

विदयुत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- १५ दिवसात माहिती देतो.

मा.सभापती साहेब :- उपस्थित विभाग प्रमुख यांनी नोंद घेवून माहिती दिली नसल्यास तात्काळ माहिती स्टोअर विभागामध्ये दयावी.

मा.श्री.मनोज कोतकर :- महानगरपालिकेची आर्थिक स्थितीनाजुक आहे.अधिकारी जर मनमानी करीत असतील तर आम्ही येथे काम करायला आलो आहोत. छोटया

छोटया गोष्टीसाठी पाठपुरावा लागतो. अग्निशमन विभागासंदर्भात सर्व सदस्यांच्या भावना तिव्र आहेत.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- डी.पी.टी.सी.कडे १ कोटी १० लाखाचा प्रस्ताव वाहन खरेदी साठी पाठविला.परंतु वाहन खरेदी साठी अनुदान मिळत नाही. घसारा निधीतुन वाहन खरेदी करीता प्रस्तावित केला. ३-४ वेळा निविदा प्रसिध्द केली. अशोक लेलंड कंपनी ऐवजी टाटा कंपनीचे वाहन घेण्यासाठी ठराव केला. ३ वेळा मुदतवाढ देवूनही एकच निविदा प्राप्त झाली आहे.त्यावर निर्णय घेणार आहोत.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- अग्निशमन पॉलिसी अशी ठरवावी की,लोकसंख्येच्या प्रमाणात वाहने लागतील. २०१० मध्ये शासन निर्णय झाला यानुसार काही नगरपालिकांना गाडया मिळाल्या. २००१ ला दुसरी पॉलीसी ठरली. अग्निशमन करीता निवासस्थाने , जागा खेरदी करू शकता, वाहन खरेदी करू शकत नाही किमान दोन गाडया अत्याधुनिक घ्याव्या लागतील. नवीन युडीसीपीआर आल्या आहेत.नविन वाहन खरेदीचे चालू वर्षात नियोजन करण्यात येईल.जी.एम.पोर्टल वरून चेसी खरेदी करून पाच ते सहा महिन्यात २ वाहने खरेदी करू.

मा.श्री. मनोज कोतकर :- मी सभापती असताना २ वाहनासाठी निधी मागणीचा प्रस्ताव पाठवू असे ठरले. माग त्यांना सांगा आग लागल्यावर वाहने पाठवा. आपल्या येथे आग लागत्यानंतर बाहेरून वाहने मागवतात.राहुरी ,पाथर्डी, शेवगाव येथुन वाहने येतात.

मा.आयुक्त साहेब श्री. शंकर गोरे साहेब :- आपल्याला २ गाडया घेवू

मा.सभापती साहेब :- नव्या गाडया आणल्या नंतर त्यावर काम करण्यासाठी आपल्याकडे टेक्नीकल स्टाफ आहे का ? अग्निशमन वाहन खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २५ लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- आमची नगरपालिकेची ब्रिटीशकालीन सभागृह होते. आगीत ते जळाले.तेथील रेकॉर्ड जळून खाक झाले. ऐतिहासीक वारसा नष्ट झाला.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- विभागाकडे एकुण २७ कर्मचारी आहे.त्यापैकी प्रशिक्षण घेतलेले ८ कर्मचारी आहेत. ड्रायव्हर वेगळया विभागाकडून घेतले आहे. कर्मचा-या अभावी केडगाव अग्निशमन केंद्र बंद आहे.

मा.सभापती साहेब :- देव कृपेनी मोठी घटना घडू नये, जर घडली तर प्रशिक्षीत स्टाफ असणे आवश्यक आहे. आउटसोर्सींगचे टेंडर बाबत लवकरात लवकार कार्यवाही करावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- ठेका पध्दतीने न देता मानधनावर घ्यावे

मा.उपायुक्त श्री. प्रदीप पठारे :- ते कायदेशीर नाही.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- आउट सोर्सिंगचा विषय आहे. पाणी पुरवठा विभागा करीता श्री. सातपुतेंनी टेंडर काढले त्याला प्रतिसाद मिळालेला नाही. सगळया कामावर परिणाम होतो. कर्मचारी उपलब्ध होत नाही. याच्या आधी जे कर्मचारी भरले त्यांना पगार मिळत नाही. यावर ठोस पावले उचलले पाहीजे. पाणी पुरवठयावर जर परिणाम होतो. आय.टी.आय.चे विद्यार्थी काम करतात. जुन्यांची मुदत संपली त्यांना कसे सामावून घेता येईल, यावर निर्णय घेतला पाहीजे.सारसनगर , बुरुडगांव भागामध्ये घाण पाण्याने लोक त्रस्त आहेत. नगरकराच्या जिवाशी खेळण्याचा प्रयत्न चालू आहे. याबाबतीत आपण काय करणार.

मा.सभापती साहेब स्थायी समिती :- टेंडर काढुन जर प्रतिसाद मिळत नसेल तर काय करणार.

श्री.मिसाळ :- मनपा फंडातून २० लाख तरतुद केली आहे.

मा.श्री.शेख मुदस्सर :- जुन्यांनाच घ्या असे आम्ही म्हणत नाही, पेपरला जाहिरात देवुन प्रसिध्द द्या

मा.उपायुक्त श्री.डांगे :- निधी उपलब्ध करुन दिलातर ठेकेदार येईल. १४ व्या वित्त आयोगाचे पैसे खर्च करावे लागतील.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- १४ व्या वित्त आयोगातुन निधीतुन खर्च करायचा म्हणून महानगरपालिकेचा ठराव घ्यावा लागेल.

मा.श्री.शाम नळकांडे :- १४ व्या वित्त आयोगाचा अखर्चित निधी किती आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- १४ व्या वित्त आयोगातुन करता येणार नाही. १५ व्या वित्त आयोगातुन जर करायचा असेल तर शासनाच्या गाईडलाईन पाहुन घ्याव्या लागतील.

मा.आयुक्त साहेब :- पाणी पुरवठया साठी १५ व्या वित्त आयोगात तरतुद आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- पाणी पुरवठा विभाग पान क्र.३९ अ.क्र.नंबर १३ कार्यालयीन खर्च (बाहय यंत्रणा) करीता रक्कम रूपये २ कोटींची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- लवकरात लवकर टेंडर प्रसिध्द करा. नळधारकाकडून जमा पाणी पट्टी या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २ कोटींने वाढ करण्यात यावी. समर्थ नगर उंच पाण्याची टाकी करीता १० लाखांनी वाढ करण्यात यावी. शहरातील विविध ठिकाणी क्रीडांगणे विकसीत करणे करीता रक्कम रूपये ५ लाखांनी तरतुद वाढविण्यात यावी.

मा.श्री.मनोज कोतकर :- पैसे खर्च न करता अग्निशमन साठी ठेवा.

मा.आयुक्त साहेब :- आठ दिवसापुर्वी अग्निशमनसाठी प्रस्ताव सादर करायला सांगितले आहेत. निधी देण्याची व्यवस्था करतो.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- चेसीज करीता टेंडर प्रसिध्द केले आहे.

मा.श्री.सचिन शिंदे :- आरक्षणाच्या जागा किती आहेत.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :-अग्निशमन केंद्रा साठी पाच जागा आहेत.

मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोड वर एक आरक्षण पडले आहे. ती जागा आपल्या ताब्यात आहे का ? १० गुंठयांची जागा आहे. त्याला दुस-याने कंम्पौंड केले आहे.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- जागा संपादन करुन घ्यावी लागते. निधीची कमतरता असल्याने टीडीआर दयायचो. आता ए.आर चा त्याचा प्रस्ताव आहे. अे.आर नुसार काही जागा आपल्याला मिळेल.

मा.सभापती साहेब :- सावेडी, बोल्हेगांव ,नागापुर या उपनगरांमधील नागरीकांचे आरोग्य विषयक सूविधा देणे करीता सावेडी येथील प्रभात बेकरी मागील जागेमध्ये ए.आर. च्या माध्यमातुन महानगरपालिकेचे अदयावत हॉस्पीटलची उभारणी करीता प्रशासनाने संबंधितांकडे पाठपुरावा करून गोरगरीब नागरीकांकरीता आरोग्य सेवा लवकर उपलब्ध करून दयावी. टि.डी.आर.च्या माध्यमातुन काही मोक्याच्या व विकसीत करता येत्‌ील अशा जागा महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आहेत. अशा जागेचा सर्व्हे करून त्या जागा विकसीत करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावेत.

मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोडला मागच्या दोन महिन्यापुर्वी बिल्डींग बांधून देणार होते. आपले कर्मचारी राहतील. त्याचे काय झाले. आम्ही फेज-२ लाईन टाकली, त्यानी ती बंद केली. पत्रे ठोकले. अग्निशमन साठी जेवढे आरक्षण टाकले ते ताब्यात घ्या.

मा.सभापती साहेब :- मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री . मानकर :- पान नंबर ३७ महसुली जमा.वाचन केले.

श्री.शेख मुदस्सर :- जि.प.ची थकबाकी बरेच वर्षा पासुन आहे.आपल्याला वसुल करता आली नाही.

पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- मुख्य जलवाहिनी मीटर व्दारे नळ कनेक्शन, नळ धारक २२ कोटी रूपये वसुली विभागामार्फत वसुल करण्यात येते. विळद ते वसंतटेकडी यावर जे मीटर कनेक्शन आहे. जास्तीची थकबाकी, ग्रामपंचायतींना पाणी पुरवठा करतो त्यांची थकबाकी आहे. वरवंडी व ५ गावंचा पाणी पुरवठा बंद केला आहे. देहरे- २ कोटी २१लाख , हिंगणगांव पाणी पुरवठा बंद केला आहे. बुरुडगांव पाणीपुरवठा बंद केला आहे.त्या ठिकाणी

५९.०२ कोटी थकबाकी आहे. यापुर्वी ब-याचशा बैठका मुख्याधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे झाल्या. पाणी पुरवठा बंद केल्यानंतर किरकोळ रक्कम भरतात. शासनाला

ग्रामीणपाणी पुरवठा विभागाला पत्र व्यवहार केला आहे. यावर अदयाप सर्व मान्य तोडगा निघाला नाही. शासनाकडून जे अनुदान मिळते त्यातुन कपात करून मनपास देण्या बाबत कळविले आहे. बरेचसे कनेक्शन मजिप्रा ने दिले आहे.

मा.आयुक्त साहेब :- ग्रामपंचायती पैसे भरु शकत नाही. पर्याय एकच आहे. मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे बैठक लावून १५ व्या वित्त आयोगातुन टप्प्या टप्प्यातुन आपल्याला द्या अशी मागणी करु शकतो.

सभापती, स्थायी समिती :- २ लाख १५ हजार मिळकत धारकांच्या नोंदी आहेत. ७० हजार कनेक्शन आहेत. माझ्याकडे माहिती आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- किती अधिकृत व किती अनधिकृत आहे याचा सर्व्हे करा. यापासुन उत्पन्न मिळेल.

सभापती, स्थायी समिती :- अधिकृत करुन घ्या. जे अनाधिकृत आहे.त्यांचे मागचे जावू द्या. एखादी स्कीम जाहीर करा. कसे पैसे येतील ते पहा.

मा.श्री.सचिन शिंदे :- पंपींगचे किती बील येते.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- दर महिन्याला २.२५ कोटी लागतात.

मा.श्री.सचिन शिंदे :- पवनचक्की, सोलर वगैरे उपाययोजना करु शकतो का. मुळा डॅमला पवनचक्क्या बसवू शकतो का.

मा.आयुक्त साहेब :- अमृतमध्ये सोलर १२५० के.व्ही मंजूर आहे. वर्क ऑर्डर देवून वर्ष झाले. ते करत नाही म्हणुन त्यांना अंतिम कळवून टाकणार आहोत. मा.महापौर साो यांचेशी चर्चा केली आमचे लाईटबील ३८ कोटीचे ५० टक्क्यावर येईल.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- सोलर बसविण्या चे १० ठिकाणे आहेत.

मा.श्री.सचिन शिंदे :- किती लाईट बील महानगरपालिकेचे वाचेल.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- १०ते १२ टक्के बचत होईल.

मा.आयुक्त साहेब :- मार्च अखेर कुठल्यातरी निर्णया पर्यंत येवू.

सभापती, स्थायी समिती :- अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी. नळधारकाकडून जमा पाणी पट्टी या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २ कोटींने वाढ करण्यात यावी. पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख ने वाढ करण्यात यावी.

पान नंबर ४० शासनाकडून भांडवली जमा.

डॉ.श्री.सागर बोरुडे :- रस्ता फोडणे- जोडणे, बिल्डर लोक डायरेक्ट रस्ता फोडतात आपले कोणाचेही नियंत्रण नाही. बांधकाम व केअर टेकरचे नियंत्रण ठेवले तर आळा बसेल. नंतर पॅचिंग करा. आम्हाला सांगावे लागते. डॉन बॉस्को कॉलनीत ड्रेनेज लाईन फुटली आजूबाजूला दुषीत पाणी येते. पारखेंना १० वेळा फोन केले. प्रशासन गतीमान करा म्हणता , फेज -२ योजना गेली. अमृत योजना आली. इकडे खालचे कर्मचारी कामच करत नसतील तर कसे होणार.

मा. उपायुक्त (सा) :- श्री.पारखे मी तुम्हाला फोन केला, कधी होईल हे विचारले, तुम्ही मला उद्या होवून जाईल असे सांगीतले.

बांधकाम विभाग अभियंता श्री.पारखे :- ठेकेदाराला फॉलोअप घेतला.ज्यावेळी मी तुम्हाला सांगीतले त्यावेळी स्वच्छ सर्व्हेक्षणाची माझ्याकडे डिमांड नव्हती. त्यामुळे कर्मचारी तिकडे डायव्हर्ट करावे लागले. आज किंवा उद्या काम होईल.

मा.श्री.डॉ. सागर बोरुडे :- एकपाईप टाकायला इतके दिवस लागले काम कसे करायचे, आरोग्याचा प्रश्न आहे. कावीळ झाली, डेंग्यु झाला तर काय करणार.

मा.सभापती साहेब :- रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

मा.श्री.शाम नळकांडे :- माझ्या भागात सुध्दा चेंबर दुरुस्ती कल्याण रोडला एकही झाली नाही.

मा.श्री.सचिन शिंदे :- कल्याण रोड चेंबर चोकअप आहे. दिनेश हॉटेल समोरील रस्त्यावर पाणी वाहते. इथापे साहब ,पठारे यांनी समक्ष पाहणी केली.

श्री.इथापे अतिक्रमण विभाग प्रमुख :- सन्माननीय सदस्यांनी प्रश्न केला यापुर्वी वार्षिक टेंडर नव्हते. आत्तापर्यत २५० ते ३०० चेंबर रिपेअर केले आहेत.कल्याण रोडचा बराचसा भाग काळया मातीचा आहे. रस्त्याच्या बाजुला गटार व्यवस्था नाही. भुमीगत गटार नाही. ओपन गटार नाही. प्रश्न व्यापक आहे. दुसरा प्रश्न दिनेश हॉटेल समोरील चेंबरचवे पाणी रस्त्यावर वाहत आहे.त्या ठिकाणी काळी माती आहे. जो भाग खराब झाला तो भाग बदलणार आहे.या कामासाठी बजेट तरतुद नव्हती. आठ दिवसात दिनेश हॉटेल समोरील काम होईल.

मा.श्री.शाम नळकांडे :- एकही चेंबर कल्याण रोडला दुरुस्त केले नाही. त्यात जर कोणी पडून अपघात झाला तर त्याला कोणाला जबाबदार धरणार.

श्री.इथापे अतिक्रमण विभाग प्रमुख :- शाहरात चेंबर दुरूस्तीची मागणी खूप आहे. प्रायोरीटीची काम करायला सांगणार आहे.

मा. सभापती साहेब :- माणसे वाढवायला सांगा.

श्री.इथापे अतिक्रमण विभाग प्रमुख :- पुढच्या वर्षी साठी दोन भाग करु, दोन वेगळया एजन्सी येतील.

मा.श्री.शाम नळकांडे :- तातडीने आदेश द्यायला सांगा.

श्री.इथापे अतिक्रमण विभाग प्रमुख :- तातडीने करायला सांगतो. जिथे फुटले तिथे नविन पाईप टाकणे हा मार्ग नाही. आरोग्य विभागाने सफाई करावी.

सभापती, स्थायी समिती :- मा.सदस्यांनी मागणी केलेली कामे, प्राधान्याने करुन घ्या.

मा.मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- पान नंबर ४० भांडवली जमा वाचन केले.

महसुल खर्चा कडे जावू पान नंबर १३,पान नंबर १५,पान नंबर १७ वरील तरतुदींचे वाचन केले.

मा.श्री.डॉ.सागर बोरुडे :- किती टॉवर अधिकृत किती अनधिकृत

सहाय्यक संचालक नगररचना श्री.चारठाणकर :- सर्व्हे आमच्याकडून झालेला नाही. नियमीतीकरणा ची कारवाई आमच्या कडून होते.अनधिकृतचा सर्व्हे झालेला नाही.

उपायुक्त श्री.डांगे :- मोबाईल टॉवर एकुण २२३ आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- एकुण किती, त्यातून कायदेशीर किती, बेकायदेशीर किती. बेकायदेशीर यांना दंडात्मक आकारणी करा.

मा.सभापती साहेबः- पुढच्या स्थायी समिती सभेला माहिती देण्यांत यावी.

श्री.झिने, रिव्हीजन विभाग प्रमुख :- मालक व मोबाईल टॉवर कंपनी यांच्या करारानुसार ५२ टक्के टॅक्स आकारला जातो.एका टॉवरला ५२-५३ हजार आकारणी होते. वसुली १.५ कोटी आहे. बाकी ७.०० कोटी आहे. काही कंपन्यांवर कारवाई करावी लागेल. नोटीसी काढल्या आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- थकबाकी वसुल करा. सील केले तर ताबडतोब पैसे भरतील.

मा.सभापती साहेबः- सील करण्याची कार्यवाही करा.

उपायुक्त श्री.डांगे :- एअरटेल व जीओ पैसे आले आहेत. टॉवर डायरेक्ट सील करता येत नाही. ३१ मार्च पर्यंत वसुलीचा प्रयत्न करीत आहोत. ॲक्शन घेण्याची गरज नाही.

मा.सभापती साहेब :- मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.२५ लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर : पान नंबर २० वाचन केले

डॉ.श्री.सागर बोरुडे :- प्रतिपुर्ती साठी कर्मचा-यांची पॉलिरसी करावी. ॲडमीट झाल्यानंतर त्याला अगोदर पैसे खर्च करावे लागतात. कर्मचा-याची पैसे खर्च करण्याची क्षमता नसते. पॉलिशी केली तर तो डायरेक्ट ॲडमिट होवू शकेल. सर्व अधिकारी कर्मचा-यांची पॉलिशी करावी.

मा.उपायुक्त श्री.पठारे :- आपल्याला ३० लाख प्रतिवर्षी खर्च येतो पॉलिसी चा खर्च मोठा आहे. अर्धा पार्ट कर्मचा-यास उचलावा लागेल. एक कुटुंबाकरीता वार्षिक हप्ता १० हजार जातो.

मा.उपायुक्त (सा) :- अपघात विमा कर्मचा-यालाच विचारुन त्यांच्या वेतनातुन कपात करतो. त्यांनी संमती द्यायला पाहीजे.

सभापती स्थायी समिती :- कर्मचा-या बरोबर कुटुंब धोक्यात येते आपली जबाबदारी आहे. कर्मचारी आपले आहेत. बीले त्वरीत देण्यांत यावीत. कॅशलेस सुविधा उपलब्ध व्हावी. आपले कर्तव्य आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- एखाद्या हॉस्पीटलशी करार करा. काही कर्मचारी सुटी असतांना सुध्दा कामावर येतात.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- आजारी पडल्यावर काही वेळेला पैसे असतात काही वेळेला नसतात.

मा.सभापती साहेबः- काही तरी करुन मार्ग काढा.

उपायुक्त श्री.पठारे :- ५० ते ६० प्रतिपुर्ती कॅशलेस केली तर १ कोटी ५० लाख द्यावे लागतील.

डॉ.श्री.सागर बोरुडे :- आनंदऋषीजी हॉस्पीटलशी चर्चा करावी.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- इन्शुरन्स कंपन्या बरोबर चर्चा करुन त्यावर ते उपायुक्त सांगतील त्याप्रमाणे तरतुद करावी लागेल. कायदेशीर बाबींची पुर्तता करून कॅशलेस सुविधे साठी दुसरी एखादी तरतुद कमी करून या करीता तरतुद करावी.

उपायुक्त श्री.पठारे :- पैसे उपलबध करुन द्यावे लागतील. अगोदर पैसे उपलब्ध करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- आपल्याला १८०० लोकांचे पैसे मेडीक्लम कंपनीला दयावे लागतील. ते आपल्याला तोटयात आहे. ३ लाख ची पॉलिसी करायची की ५ लाखाची पॉलीसी उतरावयाची ठरवावे लागेल. कॅशलेशची रक्कम कर्मचारी यांना द्यावी लागेल. आता जे आहे ते योग्य आहे. एकाच आजारावर ३ लाख खर्च झाला तर . तर पुढील आजार पणावर कर्मचा-याला स्वतः खर्च त्याला करावा लागेल. आता आहे तेच चालू ठेवा.

डॉ.श्री.सागर बोरुडे :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची योजना चालू आहे. त्यांचेकडून माहिती घ्या.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- आपली ड वर्ग महानगरपालिका आहे त्यांची तुलना होवू शकत नाही.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर पान नंबर २२ वाचन

डॉ.श्री.सागर बोरुडे :- मोकाट कुत्रे धरण्याचा ठेका कोणाकडे आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- मागच्या वर्षी कीती खर्च झाला.

स्वच्छता निरीक्षक श्री.रामदीन :- पीपल फॉर ॲनीमल या संस्थेस ठेका दिला आहे.. कुत्रे धरल्यानंतर ४ दिवस ठेवतात. निर्बिजीकरण करुन ज्या ठिकाणावरून आणले त्याच ठिकाणी सोडतात. १ ऑक्टोबर पासुन ३०५६ कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले आहे. आत्तापर्यंत ४ बीले अदा केली आहे. प्रत्येक कुत्र्याचा १३०० रुपये खर्च येतो. चार बीले मिळून एकुण १८.०० लाख खर्च आला. श्री.भोसले नांवाचा कर्मचारी या गाडी बरोबर असतो. गाडी रोज शहरामध्ये फिरते आपल्याकडे केलेल्या कामाचे नोंदणी रजिष्टर ठेवले आहे.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- जे कुत्रे पकडले व त्यांच्यावर शस्त्रक्रीया झाली त्याचे कान कापल्याचे आता सांगीतले .आपण सर्व नगरसेवक इथे आहोत. कान कापलेले कुत्रे कोणाला सापडले तर सांगा.

मा.श्री.शेख मुदस्सर :- निर्बिजीकरणानंतर त्याचा अवयव काढून ठेवतात .त्याचे रेकॉर्ड ठेवले जाते असे उपायुक्तांनी सांगीतले आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- कुत्रे निर्बीजीकरणावर ५-६ वर्ष काम केल्यानंतर शहरातील भटक्या कुत्र्यांची संख्या कमी होईल. आपण पिंपळगावला या प्रकल्पावर व्हीजीट करु.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- पान नंबर २३ विद्युत साहित्य खरेदी वाचन

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- शहरात मोकाट जनावरे फिरत असतांना महानगरपालिकेचा जनावरांचा एकही डॉक्टर नाही. सारसनगर मध्ये दोन बैलांची झुंज झाली. एका बैलाने दुस-या बैलाच्या पोटात शिंग खुपसले. काल आठ ते दहा डॉक्टरांना कॉल केला पण ते लोक आले नाहीत. महानगरपालिकेची यंत्रणा उपाययोजना म्हणून एखाद्या डॉक्टरांची नेमणूक केली पाहीजे. मानधनावन नियुक्ती करा.

मा.आयुक्त साहेब :- मानधनावर नियुक्ती करा.

डॉ.श्री.सागर बोरुडे :- पंचवटी नगरमध्ये जनावरांमध्ये झुंज होवून जखमी झाले. स्टॅण्ड जवळील दवाखान्यात गाय न्यायला सांगीतले. तिथपर्यंत गाय कशी घेवून जाणार. उपायुक्त मा.उपायुकत श्री.डांगे :- तालुका पशु वैद्यकीय अधिकारी असतो. त्याच्या हाताखाली दोन तीन कर्मचारी असतात त्यांनी साईट वर यायला पाहीजे होते.

मा.श्री.मनोज कोतकर :- पाणी पुरवठयाची आपण मिटींग घेतली.केडगांव योजनेवरुन कल्याण रोडला पाणी पुरवठा द्यायचा विषय घेतला. येथुन पुढे केडगांवच्या पाईप लाईनचा कुणीही विषय घ्यायचा नाही.

मा.श्री.शाम नळकांडे :- आम्ही तुमचे पाणी मागत नाही.

मा.सभापती साहेबः- यावर कोणता निर्णय झालेला नाही. चर्चा झालेली आहे.

मा.सभापती साहेब :- ही बजेटची मिटींग आहे.बजेच्या विषयावर चर्चा करा.पाणीपुरवठयावर बोलू नका.

मा.श्री. सचिन शिंदे :- आम्हाला दिवसाआड पाणी पाहिजे .आम्ही घरपटटी , पाणीपटटी भरतो.

मा.सभापती साहेब :- प्रशासन निर्णय घेईल.

मुख्यलेखाधिकारी :- श्री.मानकर पान नं. २३ रस्ते व इमारतीवरील दिवाबत्ती वाचन

मा.श्री. सचिन शिंदे :- यश पॅकेज ते कोठी रोड वर दोन दोन इलेक्ट्रीक पोल आहेत. एक जागेवर तीन फिटींग लावल्या आहेत.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- तुमच्या भागातले बोलले तर बरे होईल. आपल्याकडे नसतील तर मागणी करा. प्रभागातील काम साठी मागणी करूनही इलेक्ट्रीक साहित्य मिळाले नाही तर, मोर्चा घेवून येवू.आंदोलन करू यापुर्वी आपण हे केलेले आहे.या ठिकाणच्या लाईट ७५ टक्के बंद आहेत पुर्वी बासविण्यात आलेले टयुबलर पोल तसेच आहेत.

मा.सभापती साहेब :- मेहेत्रे पाहून घ्या, चुकीचा विषय असेल तर दुरूस्त करा.

विदयुत प्रमुख श्री. मेहेत्रे :- एल.ई.डी लाईट बसविण्या करीता १ कोटी १० लाख तरतुदी केली आहे.मनपाला प्रति महिना विदयुत बिल ३८ लाख बील येते. हे ३८ लाख रूपये खाजगी ठेकेदार कंपनीला दिल्यावर त्यातुन हे काम होणार आहे. निविदा फायनल झाली तर प्रॉब्लेम राहणार नाही.

यावर्षी मनपा फंडातर्फे २८ लाख खरेदी, व नगरसेवक निधी ६७ लाखाचे विदयुत साहीत्य खरेदी केले. थर्ड पार्टीसाठी कॉलेज ऑफ इंजि. ला पत्र दिले.दोन एजन्सीला डेमो देणेस सूचना केली.त्यापैकी एका एजन्सीने दिलेल्या मुदतीत डेमो दिला नाही.त्यानंतर त्याला मुदतवाढ देवूनही डेमे न दिल्याने त्याचा व्यापारी लिफाफा उघडला नाही.तो मनपा विरूध्द न्यायालयात गेला आहे. कोर्टाने १५ दिवसाची मुदत दिली आहे.कोर्टाने वर्क ऑर्डर देवू नका असे सांगितले आहे. तोपर्यत स्थायी समितीची प्रोसेस करू.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- नवीन पोल कोण बसविणार

विदयुत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- इमारतीवर फिक्चल बसविण्याची त्याची जबाबदारी आहे.नविन पोल वर बसविता येतील.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- मा.सभापती साहेब यांनी कोर्ट वगैरे च्या बाबत मदत करता येईल ते पहा.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- ही गोष्ट जे येत जाणे गरजेची नव्हती.दुर्देव आपल्या हातात जे करणे गरजेचे होते ते केले नाही.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- संबंधीत ठेकेदाराला चर्चे साठी बोलवून मार्ग काही मार्ग काढता येतो का, ते पहा.

विदयुत वि.प्रमुख श्री. मेहेत्रे :- डेमोसाठी ३ वेळा मुदत दिली.

मा.सभापती साहेब :- प्रक्रिया चालू ठेवा. वाईटात वाईट विचार केला तर काही जास्त दिवस लागतील. प्रक्रिया चालू ठेवा.

मा.श्री.सचिन शिंदे :- किती वॅटच्या लावणार आहे.

विदुयत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- आत ज्या फिक्चर आहे त्या लावणार आहे. आपण ही पाहू शकता. रोडच्या विडथ् नुसार लावणार आहे.

मा.सभापती साहेब :- आत्ता ज्या क्षमतेची लाईट असेल ती तरतुद केलेली आहे. पाहिल्यापेक्षा चांगला उजेड पडतो जे बील एम.ई .सी.बी ला भरतो तेवढे ठेकेदाराला दयावे लागेल. देखभाल दुरूस्ती करीता होणा-या १ कोटी १० लाख रूपये रकमेची बचत होईल. टायमर बसवणारआहे. कंट्रोल रूम राहणार आहे.पोलवर नंबर राहणार आह ज्या पोलवरील लाईट बंद झालेला आहे तो ठेकेदाराला करणार आहे. एक ॲप विकसीत करणार आहे. तक्रार नोंदविण्या करीता टोल फ्रि नंबर देणार आहे.यावर तक्रार केल्यानंतर ४८ तासात लाईट बसवून देणे बंधनकारक केले आहे.

विदयुत वि.प्रमुख श्री. मेहेत्रे :- नवीन पोल लावयची मनपाची जबाबदारी आहे.सर्व्हिस पोलचा मेंन्टनन्स मनपा करणार आहे.

मा.सभापती साहेब :- गल्ली बोळातील भितीवर, लाईट बसवणार

मा.श्री. मनोज कोतकर :- किती दिवसात मार्गी लागेल.

विदयुत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- कोर्ट प्रोसेस मुळे विलंब होवू शकतो नाहीतर १ महिन्यात मार्गी लागेल.

मा.सभापती साहेब - चार महिने गृहीत धरा

विदयुत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- कोर्टाचा निर्णय झाला ,तरी त्यालाचा चान्स देता येणार नाही . कारण त्यांचे टेंडर रिजेक्ट आले आहे.

मा.श्री.कोतकर :- मी सभापती असतांना इलेक्टीक विभागाचे काम केलेलया ठेकेदारांनी निवेदन दिले होते. त्यांचे बीले दिली जात नाहीत.

मा.उपायुक्त श्री. डांगे सो. :- त्रिसदस्यीय समिती नेमू

विदयुत वि. प्रमुख श्री. मेहेत्रे :- सन २०१६-२०१७ मध्ये या लाईट बसविल्या आहेत.थर्ड पार्टी इन्स्पेक्शन झाले की,प्रॉब्लीम सॉल होईल.

मा.सभापती साहेब :- ज्या लोकांनी फिटींग बसविल्या त्यांनी बसविलेल्या फिटींग नविन येणा-या ठेकेदारने त्या काढून घेतल्या तर त्यांचे काम दिसणार नाही. नवीन

ठेकेदार सध्याच्या लाईट काढून घेणार आहेत.जुने ठेकेदार कोर्टा मध्ये गेले तर अडचणी वाढतील. त्यांच्यावर अन्याय होणार नाही असा मार्ग काढू.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- पान नं.२५ चे वाचन केले.

मा.श्री.शाम नळकांडे :- घनकच-याने जेटींग चे वाहन सतत नादुरूस्त असते नवीन वाहनाची तरतुद केले काय ?

मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे :- एक जेटींग मशीन करीता ई - निविदा व्दारे मागणी केली आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- १४ वित्त आयोगातून ४ झोन करीता ४ गाडया खरेदी करा. आमचा भाग काळया मातीचा आहे. १४ व्या वित्त आयोगातुन ४ प्रभागा साठी गाडया खरेदी करा. सध्या फोन केल्यानंतर ८ दिवसाने गाडी मिळते. या भागामध्ये गरीब समाज आहे ५०० रू. ची पावती फाडू शकत नाही.

मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे :- गावातील ब-या पैकी लाईन टाकल्या आहेत.

मा.सभापती साहेब :- शहरासाठी भविष्यात १ गाडी लागणार आहे. जेटिंग मशिन खरेदी हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- २६ कोटी मंजर आहे. मग का खरेदी करत नाही.

मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे साहेब :- ४ प्रभागा करीता ४ गाडया घेवू.

मा.श्री. मुदस्सर शेख :- जेंटींग + सक्शन मशीन घ्या.आधुनिक गाडी घ्या.

मा.सभापती साहेब :- ४ झोनला ४ गाडया घेण्यात याव्यात.

मा.श्री. शाम नळकांडे :- दिनेश हॉटेल जवळचा जो प्रश्न आता मी मांडला ते काम आता सुरू आल्याचे श्री. इथापे यांनी सांगितले. श्री.इथापे यांनी समक्ष पाहणी करावी.

डॉ शेडाळे :- सप्टेंबर पासून बंद आहे. कोरोना काळात लॅब टेक्नीशीयन ची डयुटी कोरोना करीता लावण्यात आली.परत चालू करायची असेल तर सर्व टेक्नीकल स्टाफ घ्यावा लागेल. ४ लॅब टेक्नीशीयन आहेत ३ सिस्टर आहेत. सध्या त्या कोरोना कडे डयुटी वर आहे. ते सोडून पी.आर.ओ. १ ,टेक्नीकल सुपरवायझर २,सिस्टर २,क्लार्क २ याव्यतिरिक्त लागतील.

मा.सभापती साहेब :- कर्मचारी असताना रक्तपेढी बंद आहे.

डॉ.शेडाळे : - टेक्नीकल सुपरवायझर पाहिजे

मा.सभापती साहेब :- सर्व स्टाफ होता ,त्योवळी संकलन बंद होते का ?

डॉ.शेडाळे :- मार्चमध्ये कलेक्टर साहेबांचे आदेश आले, कॅम्प घेवू नका. नंतर कॅम्प भेटला नाही.

मा.सभापती साहेब :- नंतर आपण पाहिले नाही का? कॅम्प वगैरे घेण्यासाठी प्रयत्न केला नाही का? श्री.डॉ. बोरूडे यांनी फोन केला त्यावेळी स्टाफ नव्हता.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- कॅम्प न घेता.एक -एक जण जावून ब्लड बॅकेत जावून ब्लड डोनेट करणे चालू ठेवू शकता.ब्लड बॅक बंद करा असे आदेश दिले नव्हते.

मा.सभापती साहेब :- तुम्हाला स्टाफ दिल तर किती दिवसात चालू करू शकता.

श्री. शेंडाळे :- एक महिना लागेल.मशिनरीची कॅलीब्रेशन करावे लागेल.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- नगरमध्ये सगळयात स्वस्त ब्लड बॅक आहे गोरगरीबांना आधार आहे.

मा.सभापती साहेब :- तरतुद वाढवा, जितक्या लवकर चालू करता येईल. तितक्या लवकर चालू करावी.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे साहेब :- कोरोना काळात कोणतेही आरोग्यचे युनिट बंद करण्याचे कुठेचआदेश नाही. तुमचे टेक्नीकली मुद्दे संयुक्तीक वाटत नाही. काल जो काही स्टाफ लागेल तो देवू. नागरिकांच्या जीवनाशी निगडीत बाबी आहे.

१५ एप्रिलपर्यत ब्लड बॅक चालू झाली पाहिजे. मानधनावर स्टाफ घ्या.१० एप्रिलपर्यत सर्व मंजुर घ्या. आपल्यालाच काम करावे लगेल. तुम्ही आजपासून कामाला लागा.कुठेलीही अडचण सांगू नका. सध्याच्या कोरोना काळामध्ये रक्ताचा तुटवडा झाल्या बाबत सर्वत्र वर्तमान पत्रातुन गेल्या ८ दिवसात बातम्या येत आहे.ही संस्थेची नैतिक जबाबदारी आहे.

मा.सभापती साहेब :- रक्त पेढी सुरू झाल्यावर पाहिले रक्तदान मी करतो.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- रक्त विघटन करण्यासाठी लागणा-या मशीनरी खरेदी करण्या करीता मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांचे पाठपुराव्यातुन निधी उपलब्ध करून दिला आहे.परंतु सध्या मनपाच्या रक्ता पासून वेगवेगळ घटक बनविले जात नाही. ते कार्यान्वीत करण्याचे आदेश घ्यावेत.

मा.सभापती साहेब :- आपण अगोदर ब्लडबॅक चालू करू. रक्तपेढी औषधे व उपकरणे खरेदी करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.श्री. शाम नळकांडे :- रक्तपेढी ताबडतोब चालू करण्याचा जे निर्णय घेतला याबददल आयुक्त सो. यांचे अभिनंदन.आम्ही सुध्दा रक्तपेढीत रक्त जमा करण्यासाठी मदत करू. कॅम्प जास्तीत जास्त घ्या.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे येथील रक्तपेढी पुर्ववत सुरू करणे करीता आवश्यक असलेला आपल्याकडील डॉक्टर, तांत्रिक कर्मचारी इतर विभागामध्ये नियुक्ती रदद करण्यात येवून आवश्यक ते कर्मचारी मानधनावर नियुकती करून गोरगरीब गरजु जनतेचा विचार करून

रक्तपेढी तात्काळ पुर्ववत सुरू करण्यात यावी. रक्तपेढी औषधे व उपकरणे खरेदी करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १० लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- सावेडी नागापूर भागात कर्मचारी राहतात त्यांना हॉस्पीटलची आवश्यकता आहे मनपाची आरक्षीत जागा असेल तर छोटा मोठा दवाखाना उभारण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- सावेडी शाळासमोर प्रभात बेकरीच्या पाठीमागे १४००० स्वे.फुट ए.आर.च्या माध्यमातुन आपल्याला इमारत बांधकाम करून देणार आहेत.

नगररचना विभाग श्री.चारठाणकर :- महापालिकेला जो हिस्सा दिला, त्यामध्ये आदयाप बांधकाम सुरू केले नाही. इमारतीमध्यील बी.ॲण्ड सी पार्ट त्यांचेकडे राहणार त्याशिवाय आपण त्यांना कम्लेकशन देणार नाही.ए.आर. अंतर्गत जे काही आरक्षण घेतले त्या सर्वाचा आढावा घेवून मनपा हिश्याचे बांधकाम सूरू केले नसल्यास संपुर्ण बांधकामास स्थगीती देण्या बाबत निर्णय घेता येईल.

मा.सभापती साहेब :- ए.आर.चे आणखी काही विषय असतील तर ते पुढच्या मा.स्थायी समितीमध्ये घ्या.ए.आर. हा विषय काय आहे ते समजावून सांगा.त्यातील अटी शर्ती सांगा

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- पाहिल्यांदा त्यांने आपले बांधुन घ्यावे.

नगररचना विभाग श्री.चारठाणकर :- ऑकोमॉडेशन रिझर्वरेशन मध्ये भूसंपादन करू शकत नाही. वेगवेगळे आरक्षण असतात.प्रत्येकाला वेगवेगळ नियमआहे.त्या त्या मालकाकडून हस्तांतरण करून घ्यावे लागणार आहे. बायलॉज मध्ये पूर्ण बिल्डींग बददल उल्लेख आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्याला अगोदर बांधकाम करून दयावे अशी अट टाकता येईल का ?

नगररचना श्री. चारठाणकर :- सर्व प्रोजेक्टचा आढावा घेवून स्थगीती देता येईल का ?यावा आढावा घेतो.

मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे :- रिव्होकेशन ची नोटीस दया.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- ४० टक्के जागेत २५ टकके बांधकाम करता येईल अशी नगररचनाकार यांनी माहिती दिली. ती जागा काही छोटी नाही.

मा.सभापती साहेब :- त्या दोघांचे वाट चालू आहेत आपला फायदा कमी हे आपण पाहू

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- कोरोना काळात सावेडी नागापूर बोल्हेगाव भागातील गोरगरीब कोरोना उपचार घेता आले नाही. दवाखान्याचे काय झाले.

मा.श्री. शाम नळकांडे :- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे बोर्ड लावला आहे सोनोग्राफी मशिन बंद असल्याने सोनोग्राफी होत नाही.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- कै.बाळासाहेब दे.दवा येथील रेडीओलॉजीस्ट डॉ.श्रीमती हंबीरे या बालसंगोपन रजेवर आहेत.त्यामुळे काम बंद होते.कालच माझी रेडीओलॉजी असोशिएनश बरोबर चर्चा झाली असून त्याचे बरोबर एम.ओ.यू झाले आहे. उदयापासुन ते काम सूरू करणार आहे. १४ ते १८ आठवडयासाठी ते मनपास सेवा देणार आहे.दवाखान्यातील बाकीचे रूटीन काम आपले गायनालॅजीस्ट करतील.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकार :- पान नं.३०,३१,३९ चे वाचन

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- पान नं.३१ वरील ओटे नाले नदी पात्रातील अतीक्रमणे साफ सफाई करणे व कंत्राटी पध्दतीने भुयारी गटर सफाई दोन्ही विषय ओढे नाल्याशी संबंधीत असतांना वेगवेगळे लेखाशिर्ष का दाखविण्यात आले.

शहर अभियंता श्री. इथापे :- पहिला विषय कंत्राटी पध्दतीन भुयारी गटर सफाईचे काम घनकचरा विभागा मार्फत करण्यात येते.दुसरा विषय अतिक्रमण विभागाने शहरातील २० नाले पोकलन मशीनने साफ करायचे त्यासाठी तरतुद आम्ही सुचविली आहे.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- जे.सी.बी. मशीन पालिकेच असेल तर एवढा खर्च होणार नाही.

मा.सभापती साहेब :- ओढे नाले साफ सफाई करण्याची प्रक्रिया केव्हापासून चालू करता.

श्री. इथापे :- बजेट मंजुर झाल्यानंतर ,बजेटला मंजुरी मिळाली की,एप्रिल महिन्याच्या शेवटी किंवा मे च्या १ ल्या आठवडयात काम सुरू करतो. टेंडर येत नाही .पावसाळयाच्या आधी काम सुरू करणे गरजेचे आहे. बजेट लवकर मंजुर होणे व पहिल्या कॉलला टेंडर आले की, लवकर काम सुरू होते.

मा.सभापती साहेब :- लवकर प्रोसेस सुरू करा.

मा.श्री. डॉ. सागर बोरूडे :- जे रोड लगत छोटे नाले आहेत ते ही साफ करा

श्री. इथापे :- मॅन्युअली गटर साफ करायचे काम आरोग्य विभागाचे आहे.

मा.उपायुक्त श्री.डांगे :- एप्रिल पासून प्रत्येक झोनला ३० कर्मचारी उपलब्ध करून देणार आहोत.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- पान नं. ३९ वाचन , पान नं. ४५,ते ५४ वाचन

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- पॅचींग करीता ,पाईप लाईन रोड आमच्या वॉर्डात घेतला. शहराचे मेन रोड वॉर्डात समाविष्ट करू नये.

बांधकाम विभाग अभियंता श्री. पारखे शाखा :- सुरवातीला एकच टेंडर काढणे ते कोणी भरले नाही मग झोन वॉईज केले . वॉर्डातील मुख्य रस्ते घेतले.चार झोन मिळून पॅचिंग करीता २५ लाख तरतुद केली.

मा.श्री. डॉ. सागर बोरूडे :- उड्डाण पुलाचा ३५ कोटीचा जी. आर.आहे. रकमेची केंद्र शासनाकडे मागणी करावी. या विषयावर मा.महासभेत सुध्द चर्चा झाली.

मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे :- पुलाचे कामातील युटीलीटी शिपटींगसाठी निधी मा. शासन देणार आहे.

मा.श्री. डॉ. सागर बोरूडे :- एम आर आय  मशीन उचलून नेली.ही बातमी वृत्तपत्रामध्ये वाचली .या करीता  बजेटमध्ये ३ कोटी तरतुद दर्शविली आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :- एम आर आय मशीन चे  लोकमान्य संस्थेला  टेंडर दिले.एम.आर.आय.मशीन   त्यांनी पाठविली.व त्यापोटी   आपल्याला अर्धी रक्कम मागीतली टेंडर मध्ये  संपुर्ण मशीन कार्यान्वीत करून, एक प्रींट काढल्यानंतर त्याचे देयक अदा करणे बाबत निर्णय झाला आहे.परंतु त्यानी मशिन इन्टॉलेशन न करता बीलाची मागणी केली.त्यामुळे सदर सस्थेने मशीन परत नेली आहे. एक तर लवकरात लवकर मशिन  बसवा किंवा तिथे रूपये २५-३० लक्ष बांधकामाला लागणार ते त्यांनी दयावे. तो खर्च आपल्याला परवडणारा नाही.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- इन्फ्रास्ट्रक्चर आपल्याला उभारावे  लागेल त्याबाबत निर्णय घ्यावा लागेल. एजन्सी करणार नसेल तर शहर अभियंता यांचेमार्फत मोजमाप करावे लागेच एम आर आय मशीन तळमजल्यावर बसवावे लागेल. ९-१० टनाची मशीन आहे.  डॉ.बोरगे वर जबाबदारी टाकतो डॉ.बोरगे यांनी प्रायव्हेट हॉस्पीटल जशी ड्रॉईग तयार करतात.तशी ड्रॉईंग तयार करावी.शहर अभियंत्यांनी अंदाज पत्रक करावे.एक महिन्यात ती मशीन चालू व्हावी अशी अपेक्षा आहे.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- अटी व शर्तीमध्ये इन्टॅलेशन  करून देणेची अट आहे. याचा त्याने भंग केला  आहे.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- मशीन आणून बसवून तो देणार. आत तेथे कहीच व्यवस्था नाही .

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- एम.आर.आय.च्या ऐवजी सीटी स्कॅन साठी वापर करता येईल.कोवीड साठी सिटी स्कॅन मशिनचा उपयोग होईल.पर्पज चेंज करावा लागेल.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- डी.पी.डी.सी तून एम आर आय मशीन साठी निधी मिळाला आहे.याचा पर्पज चेंज करायचा असेल तर  परत तो डी.पी.टी.सी. कडे पाठवावा लागेल.

मुख्य लेखा अधिकारी श्री. मानकर :- एम आर आय साठी निधी मिळाला.त्याच कारणासाठी आपल्याला खर्च करावा लागेल.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- स्ममानभूमी साठी व्हिजीट  करावी. अमरधामची भिंत पडली आहे.ओटे पडले आहेत. बाटल्या पडलेल्या असतात. शहराच्या  जिव्हाळयाचा विषय आहे.समोरची भिंत पडली आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- अमर धाम मध्ये एक वॉचमन व सिक्युटिरी  नेमावा.

मा.सभापती साहेब :- ज्या ज्या त्रुटी असतील त्या लवकरात लवकर पुर्ण कराव्या .

बांधकाम विभाग,अभियंता श्री. पारखे :- नदीच्या बाजूची भिंत बांधकाम सुरूवात करीत आहोत.

मा.श्री. सचिन शिंदे :- नदीच्या बाजुन पाईप टाकावे लागतील.

मा.श्री. शाम नळकांडे :- भिंत बांधल्यानंतर वरती तारेचे कंपौड करा

मा.सभापती साहेब :- सुरक्षीततेच्या दृष्टीने तेथे सर्व उपाय योजना कराव्यात. स्मशान भुमी सुधारणा या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाख रूपयांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मा.श्री. डॉ. सागर बोरूडे :- पिंपळगाव तलाव हेड मध्ये , इतर ठिकाणी मत्स बिज साठी लिलाव करतात. १०x १० करीता लाखाचा लिलाव होतो. अशा प्रकारे मत्सबीज निर्मीती करून लिलावा त्याद्वारे महानगरपालिकेला उत्पन्न मिळू शकते.

मा.श्री.परसराम गायकवाड :- मृत जनावराचे टेंडर निघाले नाही.

मा.सभापती साहेब :- सध्या अहमदनगर शहरामध्ये कोव्हीडचा प्रार्दुभाव वाढत आहेत महानगरपालिकामार्फत आपण काम उपाययोजना करत आहोत माहिती दया.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे :- महानगरपालिकेच्या ७ नागरी आरोग्य केंद्रात स्वॅब तपासणी सुरू केली आहे. प्रत्येक आरोग्य केंद्राला एक लॅबटेक्नीशीयन दिले आहे.लसीकरणाचे काम काम चांगले आहे. दर आठवडयाला ६ ते ७ हजार देण्यात येतात. ७ आरोग्य केंद्रात लसीकरण चालू आहे. प्रतिसादर चांगला आहे. दोन कोवीड केंद्र सुरू केले आहे.

मा.सभापती साहेब :- ज्या काही उपाययोजना करायच्या त्या करा. पहिल्या टप्यात त्रुटी ज्या झाल्या त्या दुस-या टप्यात होवू देवू नका. हलगर्णीपणा जो कोणी करील त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- नटराज कोवीड सेंटर १४० बेड क्षमतेचे आहे. जैन पितळे वसती गृह येथे ७० बेड क्षमतेचे असून महिलांसाठी आहे.

मा.सभापती साहेब :- यासाठी निधी कमी पडू देवू नये.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- बरेच रूग्ण घरीच उपचार घेतात. पॉझीटीव रूग्णांच्या घरावर स्टीकर लावण्यात येते. १९ मायक्रो कंन्टेंनमेंट झोन केले आहे.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :- या वेळेच्या व्हायरल मध्ये मॉबेलीटीचे प्रमाणे कमी आहे.

मा.सभापती साहेब :- आम्हाला माहिती देत जा.

वैदयकीय आरोग्य अधिकारी डॉ. बोरगे :-ॲम्बुलन्स एक दोन घ्याव्या लागतील.

मा.सभापती साहेब :- जे काही करावे लागत असेल ते करा. ॲम्बुलन्स खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाखाने वाढ करण्यात यावी.

अर्थ विभाग श्री. अनिल लोंढे :- विकस योजना GIS बेस सुधारीत करणे.या लेखाशिर्षा अंतर्गत रू. ३ कोटी तरतुद ,अमृत किंवा १५ वित्त आयोगातून निधी उपलब्ध करून दयावी. मागणी नगररचना विभागाने केली आहे.

नगररचनाकार श्री.चारठाणकर :- यावर्षीसाठी रू.३ कोटीची तरतुद करावी.पुढील तीन वर्षात खर्च करावा लागेल.

मुख्य लेखा अधिकरी श्री. प्रविण मानकर :- १५ वित्त आयोगातुन खर्च करायचा असेल तर मा.महासभेचा ठराव करून मा.शासनाची मंजूरी घ्यावी लागेल.

मा.सभापती साहेब :- मा. महासभेकडे पाठवा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- १५ वित्त आयोगामधून ॲम्बुलन्स घेता येतात. शासनाचा जी.आर. आहे.त्यामधून ॲम्बुलन्स घ्यायला हरकत नाही. नगरकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे.रू.५लाख लोकसंख्येचे शहर आहे.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- २१ फेब्रुवारी पासून कोवीडचे रूग्ण वाढत आहेत.टेस्टीग वाढल्यामुळे रूग्ण संख्या दिसते. प्रायव्हेट लॅब कडे सॅम्पल डे टू डे येतात. १५% इन्फेशनचा रेट आहे. शहरात ४ पथक तयार केले आहेत.मा.जिल्हाधिकारी ,मा.पोलीस अधिक्षक , व आम्ही शहरामध्ये फिरलो विना मास्क फिरणा-यांना दंड आकारणी करणे,दुकान सिल करणे ची कारवाई केली.काल पर्यत १५ मायक्रो कन्टेनमेंट झोन केले आहे. कुटुंब किंवा परिसरात ५ पेक्षा जास्त पेशंट आढळले अशा ठिकाणी कंन्टेनमेंट केले आहे.कंन्टेंनमेंट झोन मध्ये नागरी आरोग्य केंद्र मार्फत डेली सर्व्हिस केली चालू केली आहे.थर्मल चाचणी ,टेंम्परेचर चेकअप सुरू केले आहे.मॉनीटरींग डॉक्टर मार्फत चालू केले आहे.मलेरिया विभागा मार्फत , सोडीयम हायपो क्लोराईड फवारणी चालू केली आहे. भाजीमार्केट, बस स्टॅण्ड,गर्दीची ठिकाणे येथे फवारणी करावी लागेल. ४ भराटी पथक तयार केले आहेत.प्रत्यक भरारी पथका करीता पोलीस बंदोबस्ताची मागणी केली आहे. आजपर्यत पुरेशा औषध साठा उपलब्ध आहे. याव्यतिरिक्त काही लागले तरी ते दयायची व्यवस्था आपण करू.मा.मुख्यमंत्री महोदय यांनी VC घेतली. सात सेंन्टरला लसीकरण सूरू केले आहे. ५ ठिकाणी खाजगी हॉस्पीटल मध्ये लसीकरण सुरू केले आहे. प्रायव्हेट हॉस्पीटल मध्ये रू.२५०/- फि आकारणी करून लसीकरण सुरू आहे.लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी सर्व मा. सदस्यांची मदत पाहिजे. साठ वर्षा वरील जेष्ठ नागरिकांना अगोदर कव्हर करावयाचे आहे.आपल्या प्रभागातील नागरीकांना आणण्या नेण्याची व्यवस्था मनपा मार्फत करू. या करीता मा.शासनाने तीन

महिन्याची मुदत दिली आहे.त्या पुर्वी कृतीशील कार्यक्रम आखुन मे अखेर लसीकरण पुर्ण करू.होम आयसोलेशन तयार केले आहे. डॉक्टर, इतर स्टाफ वगैरेची नेमणूक केली आहे.बुथ हॉस्पीटलला ६०-६२ पेशंट दररोज दाखल होता. वाढता प्रार्दुभाव पाहता, आज डेली पेशंट ८५ हजार दाखवले आहे. ३१ मार्चपर्यत १ लाख ३५ पर्यत आकडा जावू शकतो त्याकरीता,. ७००-८०० बेड ऑक्सीजन,व्हेंटीलेटर सह लागतील.नटराज हॉटेल मध्ये ऑक्सीजन बेड करू शकतो.रू. ८ कोटीचा निधी मागीतला आहे. तो निधी आला तर ॲम्बुलन्स घेवू शकतो.कुठेही कमी पडू नये याची तयार करतो.त्रुटी असतील तर मा.सदस्यांनी त्या सांगाव्या.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- लसीकरणाचे टगैट बाबत माहिती दया.

मा.आयुक्त श्री. शंकर गोरे :- लसीकरणाचे टप्पा १.हेल्थ वर्कर २. ६० वर्ष व त्यावरील नागरीका ३. ४५ वर्ष व त्यावरील नागरीक, हेल्थ वर्कर चे लसीकरणाचे काम ९० टक्के क्रॉस केले आहे.६० वर्षावरीन नागरीकांचे लसीकरण ३० टक्के क्रॉस केले आहे.तीसरा टप्पा ४५ वर्षा वरील नागरीकांचे लसीकरण फार कमी आहे.परवापर्यत १० टक्के काम झाले आहे.अगोदर नागरिकांमध्ये भिती होती.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- लोकांच्या जन जागृतीसाठी काय करता येईल. डेमो दयावा.

मा.श्री.डॉ. सागर बोरूडे :- पुणा स्टॅण्ड, कापडबाजार अशा गर्दीच्या ठिकाणी सोशल डिस्टंन्सीगचे पालन होत नाही.अशा ठिकाणी टिम पाठवून स्ट्रीक्ट करा.

मा.सभापती साहेब :- करून घ्या. कोविड -१९ प्रार्दुभाव रोखण्याकरीता आजार प्रतिबंधक उपया म्हणून शहर हद्दीमध्ये औषध फावरणी करण्यात यावी.या कामा करीता कोणताही निधी कमी पडू दिला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी लेखाशिर्षांतर्गत रू.१५ लाखाने वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- सध्याच्या युवा पिढीला महापुरूषांच्या पराक्रमांची व आदर्शाची ओळख व्हावी व महापुरूषांच्या कार्यातुन प्रेरणा घेवून त्यांच्यावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे.त्या करीता

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा मनपाच्या आवारामध्ये बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा.

३.महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा.

४.छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा.

वरिल सर्व पुतळे बसविणे कामी मा.शासनाचे सर्व नियम व अटी यांची परवानगी घेवून येत्या वर्षामध्ये हे सर्व पुतळे बसविण्याचा माझा प्रयत्न राहील या करीता प्रत्येकी रक्कम रूपये १० लाखांची तरतुद करण्यात यावी.त्यासाठी पुतळे बसविणे या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रूपये ४० लाखांनी वाढ करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- पिंपळगांव माळवी कोणते प्रकल्प राबविणार याची माहिती दया.

नगररचना विभाग श्री.बल्लाळ :- ७०० एकर जागा भुसंपादन झाली.मोजणी झाली.मनपाचे नांव ७ /१२ उता-यावर लागले.रामोजी फिल्म सिटी यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट साठी आले होते.पण त्यावेळी महानगरपालिकेचे नांव ७/१२ उता-यावर नसल्याने त्यांनी नकार दिला.तलावा शेजारील भिल्ल समाजाचे नागरीका जागा मागतात.दिल्ली येथी ट्रॅब्युनल कडे दाद मागीतली आहे.

मा.सभापती साहेब :- पुन्हा रामोजी फिल्म सिटी ला संपर्क करा.वॉटर पार्क सारखा प्रकल्प होवू शकतो.

श्री.बल्लाळ :- इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्रात पुन्हा जाहिरात देवू.

मा.सभापती साहेब :- नगरसेवक स्वेच्छा निधी किती मिळणार

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- प्रत्येकी ८ लाख ३६ हजार.वॉर्ड विकास निधीची तरतुद प्रशासनाने केली नाही.

मा.सभापती साहेब :- १० लाख रूपये देया पण कॅश दया.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मनपा फंडातुन दया पण कॅश दया.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- कॅश करायची असेल तर रक्कम कमी करा.

मा.सभापती साहेब :- ८ लाख कॅश करा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- वसुलीवर डिपेंन्ट राहिल.

मा.उपायुक्त श्री.पठारे :- वसुलीच्या टक्केवारीवर ठेवू.५० टक्के वसूली झाली तर ५ लाख ,६० टक्के झाली तर६ लाख.

मुख्यलेखाधिकारी श्री.मानकर :- ७ लाखाला सर्वानी समाधान मानावे.वॉर्ड मध्ये जी आत्यावश्यक कामेच करावीत.बांधकामामधील कामे करता येणार नाही.नोव्हेंबर पुर्वी ३ लाख व नोव्हेंबर नंतर ३ लाख असे दोन टप्यात देवू.

मा.सभापती साहेब :- सात लाख मंजूर करण्यात यावे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- जो काही आर्थीक चालतो त्याची माहिती सभापतींना दयायला पाहिजे की नाही.घडणा-या आर्थीक घडामोडींची माहिती सभापतींना दयावी.

मा.सभापती साहेब :- माहिती देण्यात यावी.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- नागरी सुविधा कार्यक्रम या हेडला रू.१ कोटींची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- केडगांव सोनेवाडी सब स्टेशन जवळ तीन एकर जागा आहे.त्या ठिकाणी क्रीडा संकुल विकसीत होवू शकेल.

श्री.बल्लाळ :- तीन एकर जागा आहे.प्ले ग्राउंड होवू शकते.

मा.सभापती साहेब :- केडगांव सबस्टेशनजवळ महानगरपालिकेच्या मालकीची अंदाजे तीन एकर क्षेत्रफळाची जागा असून या ठिकाणी राज्यस्तरीय स्पर्घाचे आयोजन होवू शकेल अशा स्वरूपाचे क्रीडासंकुल विकसीत करण्याकरीता सार्व.बांधकाम विभागाने प्रस्ताव तयार करून मा.शासनास पाठवून निधी मिळणे बाबत कार्यवाही करावी.

मा.सभापती साहेब :- उत्पन्नाच्या दृष्टीकोनातुन गंज बाजार,भाजी मार्केट ची जागा आहे.इतकी प्राईम जागा आहे. तेथे काही करता येईल.आणखी कोणत्या जागा असतील तर सांगा.

श्री.बल्लाळ :- गंज बाजार येथे सध्या येथे भाजी मार्केट आहे.टि.पी.स्कीम क्रमांक १ आहे.ओटयाला १ नंबर दिला आहे.मध्ये फिरायला रस्ते दिले आहे.टि.पी.स्कीम मध्ये बदल करण्यासाठी प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविला परंतु मध्यंतरी मत्रालय जळीत प्रकरणामध्ये प्रकरण गहाळ झाले.पुन्हा सादर करावे लागेल.

मा.सभापती साहेब :- पाठपुरावा करावा व त्याची माहिती सादर करावी.चितळे रोड भाजी मार्केट बाबत पुढे काय करायचे,कोणता निधी किंवा कर्ज काढून काही करता येईल का? या जागेच्या तीन बाजुने रस्ते आहे.

श्री.बल्लाळ :- एफ.बी.टी.चे टेंडर काढले पण प्रतीसाद मिळाला नाही,नेहरू मार्केट ओ.एफ.सी.व्दारे करू.

मा.सभापती साहेब :- शहर सहकारी बॅकेत मी सत्कारासाठी गेलो असता,तेथे बॅकेने एम्स हॉस्पीटल मनपाने विकत घ्यावे अशी सुचना केली.या बाबतीत मी डॉ.बोरगे ,मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांचे बरोबर चर्चा केली.आपण ते जर विकत घेतले तर लगेच चालवू शकतो का?त्या ठिकाणी ६५ बेडची व्यवस्था होवू शकते.हे अदयावत रेडीपझेशन हॉस्पीटल आहे.त्यावर सकारात्मक विचार करावा.शहर व उपनगरातील नागरीकांना याचा फायदा होईल.

मा.सभापती साहेब :- चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा. प्रोफेसर कॉलनी चौक समोरील जागेत शॉपिंग मॉल उभारणे कामी पुन्हा एकदा प्रयत्न होवून वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी

/बी.ओ.टी तत्वावर उभारणी करणे करीता प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव सादर करावेत. सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅंकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत. शहराच्या मध्यवस्तीमध्ये अस्तीत्वात असलेले गंजबाजार भाजी मार्केट अत्यंत जुने झाले असून या ठिकाणी भाजी मार्केट व आदयावत सुवर्ण पेढी (सराफ बाजार )उभारणे कामी वित्तीय संस्था /बॅंकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रशासनाने लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावेत.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- मा.ना.श्रीमती आदितीताई तटकरे या क्रीडा मंत्री आहेत.इनडोर गेमच्या बाबतीत ज्या महानगरपालिकेच्या आरक्षीत जागा आहेत त्याबाबत मा.सभापतींना श्री.बल्लाळ व नगररचनाकार श्री.चारठाणकर यांनी माहिती दयावी.

मा.सभापती साहेब :- प्रोफेसर कॉलनी नाटयगृह साठी मा.आ.संग्राम भैय्या जगताप यांनी निधी आणला आहे.लवकरच काम पुर्ण होईल.आणखी निधी लागला तर देवू असे मा.ना.अजित दादा पवार,उपमुख्यमंत्री यांनी सांगीतले आहे.नाटयगृहाचे सदयस्थिती बाबत माहिती दयावी.

बांधकाम विभाग अभियंता श्री.पारखे :- प्रेक्षक गॅलरीचे काम पुर्ण झाले आहे.प्रथम ५०० आसन क्षमता प्रस्तावित होती.नंतर ती वाढवून ती १००० आसन क्षमता करण्यात आली.स्टेजच्या वरील छताचे काम पुर्ण झाले आहे.हे काम पुर्ण होण्याकरीता ७ ते ८ महिन्याचा कालावधी लागेल.

मा.सभापती साहेब :- शहर व उपनगर, केडगांव येथे अमृत योजना चालू आहे.काम बरेच पुढे गेले आहे.अमृत योजनेचा पाठपुरावा करून त्याला गती कशी देता येईल.मनपा हिस्सा ,मा.राज्य शासनाचा हिस्सा ,मा.केंद्र शासनाचा हिस्सा या करीता श्री .निकम यांनी पाठपुरावा करावा .भुयारी गटर योजनेचे काम प्रधान्याने घेण्यात यावे. मा.राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या सुचनेच्या अनुषांगाने शहराच्या उर्वरीत सावेडी,बोल्हेगांव,केडगांव,मुकुंद नगर इ.परिसराच्या भुयारी गटर योजने करीता शहर उपनगर भुयारी गटर योजना टप्पा -२ मनपा हिस्सा नविन लेखाशिर्ष नविन लेखाशिर्षा अंतर्गत रू. ५ कोटींची तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम करीता रूपये ४९लाखांनी वाढ करण्यात यावी. मा.कै.शंकरराव घुले मा.नगराध्यक्ष यांचे कार्यकाळामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांकरीता टि.व्ही.सेंटर सावेडी या ठिकाणी मनपा कर्मचारी घरकुल योजना राबविण्यात आली होती.या योजनेला सुमारे तीस वर्षापेक्षा जादा कालावधी झाला आहे.या नंतर मनपा कर्मचा-

यांकरीता घरकुल योजना राबविण्यात आलेली नाही.या करीता नगररचना विभागाने जागा उपलब्ध करून दयावी व उपलब्ध जागेवर मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल राबविण्याचा माझा मानस आहे. "मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल योजना"या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.मा.महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती ,महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती ,महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.५० लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर हे राज्याचे मध्यवर्ती ठिकाण आहे.विदर्भ,मराठवाडयाला पश्चिम महाराष्ट्राशी जोडणारा महारार्ग शहरातुन जातो . तसेच अन्य महामार्गही शहरातुन जातात शहरामधून मोठया प्रमाणात नागरीक,प्रवासी /पर्याटक येत असतात.अहमदनगर सारंख्या ऐतीहासीक शहराची् चांगाल्या प्रकारे ओळख व्हावी या उद्देशाने महानगरपालिकेची जेथे हद्द सुरू होते. त्या ठिकाणापासून पुढे दोन किलोमिटर पर्यत सध्याच्या रोडला सर्व्हीस रोड करण्यात आल्यास शहराच्या रस्त्यांची भव्यता दिसुन येईल.सदर कामास लागणारा निधी करीता सार्व. बांधकाम विभागाने मा.शासन स्तरावर प्रस्ताव पाठवून निधी उपलब्ध करून घ्यावा.या करीता विशेष तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेत झालेली चर्चा तसेच दुरूस्ती व फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.श्री.डॉ.सागर बोरूडे :- अंदाजपत्रकीय स्थायी समिती सभेत झालेली चर्चा तसेच फेरफार यासह अंदाजपत्रक मंजुरीस शिफारस करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे. मा. महानगरपालिका सभे पुढे सर्वानुमते सादर करण्यांत यावे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२१-२२ या अंदाजपत्रकीय मिटींग साठी मा.आयुक्त , मा.उपायुक्त (सामान्य), मा.उपायुक्त (कर)सर्व विभाग प्रमुख,यांनी मेहनत घेतली आहे.मा.सदस्यांनी तरतुदी आपण सुचविल्या बद्दल मा.स्थायी समितीच्या वतीने आभार मानते.आपणा सर्वाचे आभार मानतो ,अर्थसंकल्पीय सभा संपल्याचे जाहीर करतो.

**ठराव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे .सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये सक्षम अधिका-यांच्या नेतृत्वाखाली संपुर्ण मालमत्तांचे रिव्हीजन च्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये १५ टक्के वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

* बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे. मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे. या करीता लेखाशिर्ष मध्ये रू. ६० लाख तरतुद करण्यात यावी.

* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. या लेखाशिर्षा मध्ये रू.७ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* गाळे हस्तातंरणाची प्रक्रिया प्रभावीपणे चालू असल्याने रू. २५ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

* नोटिस फि / शास्ती या लेखार्शिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ७५ लाखाने  वाढ करण्यात यावी.

* अग्निशमन विभागाच्या अधिकारी व कर्मचारी  त्यांचे कर्तव्य बजावत असतांना अपघात होण्याची शक्यता असत्याने आपण त्यांचा अपघाव विमा उतरविणे आवश्यक आहे.त्याचे बरोबर इतर विभागातील जे कर्मचारी अधिकारी त्यांचा जीव धोक्यात घालून काम करित असतील त्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांचा अपघात विमा उतरविण्यात यावा.

* अग्निशमन वाहन खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे येथील रक्तपेढी पुर्ववत सुरू करणे करीता आवश्यक असलेला आपल्याकडील डॉक्टर, तांत्रिक कर्मचारी इतर विभागामध्ये नियुक्ती रदद करण्यात येवून आवश्यक ते कर्मचारी मानधनावर नियुकती  करून  गोरगरीब गरजु जनतेचा विचार करून रक्तपेढी तात्काळ पुर्ववत सुरू करण्यात यावी.

*  चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* प्रोफेसर कॉलनी चौक समोरील जागेत शॉपिंग मॉल उभारणे कामी पुन्हा एकदा प्रयत्न होवून वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर उभारणी करणे करीता प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव सादर करावेत.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर  प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* शहराच्या मध्यवस्तीमध्ये अस्तीत्वात असलेले गंजबाजार भाजी मार्केट अत्यंत जुने झाले असून या ठिकाणी भाजी मार्केट व आदयावत सुवर्ण पेढी (सराफ बाजार )उभारणे कामी

वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रशासनाने लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावेत.

* अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.१ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

*. मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टींची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* "गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ६ लाख वाढ करण्यात यावी.

* "जाहिरात बोर्ड जागा भाडे " या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १२ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* भाडेतत्वावर दिलेल्या शाळाखोल्यामधील थकबाकीदारांवर कडक करावाई करण्यात येवून तसेच बंद असलेल्या शाळा खाजगीकरणाच्या माध्यमातुन चांगल्या शैक्षणीक संस्थांच्या मागणी नुसार भाडेतत्वावर देण्यात याव्यात जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल "मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न "या लेखाशिर्षातंर्गत रू.२५ लाखाची वाढ करण्यात यावी.

* शहरामध्ये ब-याच ठिकाणी अनाधिकृत रित्या पे ॲण्ड पार्क चालू आहे.यांची शोध मोहिम हाती घेण्यात यावी." पे ॲण्ड पार्क "या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

*मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.२५ लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

*मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

* रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

* हॉस्पीटल व दवाखाने यांचे कडून जैव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २ वर्षानी त्यामध्ये १० टक्के दरवाढ होणार असल्याने या पासुन मिळणा-या उत्पन्नामध्ये जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ३० लाखांनी वाढ करण्यात यावी.

* खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक खाजगी तत्वावर चालू असल्याने ठेकेदारास मागील व चालू वर्षी खरेदी केलेल्या गाडया ठेकेदार संस्थेस भाडेतत्वावर दिल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.तसेच ठेकेदार संस्थेबरोबर झालेल्या करारानुसार उपलब्ध असलेल्या वाहनांच्या पार्कीग करीता दिलेल्या जागेचे भाडे आकरण्यात यावे.

*मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* स्वच्छ पर्यावरण निर्माण करण्याकरिता ऑक्सीजनची जास्तीत जास्त निर्माण करणा-या करीता नगरशहरातील काही स्वयंसेविसंस्थांचे सहकार्या घेवून वृक्ष लागवड चळवळ उभी करण्यात यावी.या कामी आदरनिय पद्मश्री पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

* केडगांव सबस्टेशनजवळ महानगरपालिकेच्या मालकीची अंदाजे तीन एकर क्षेत्रफळाची जागा असून या ठिकाणी राज्यस्तरीय स्पर्धाचे आयोजन होवू शकेल अशा स्वरूपाचे क्रीडासंकुल विकसीत करण्याकरीता सार्व.बांधकाम विभागाने प्रस्ताव तयार करून मा.शासनास पाठवून निधी मिळणे बाबत कार्यवाही करावी.

* " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* " बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये रू. १० लाख रूपयांनी वाढ करावी.

* "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रू.२५लाखने वाढ सुचविण्यात येत आहे.

* सध्याच्या युवा पिढीला महापुरूषांच्या पराक्रमांची व आदर्शाची ओळख व्हावी व महापुरूषांच्या
कार्यातुन प्रेरणा घेवून त्यांच्यावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे.त्या करीता
१. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा मनपाच्या आवारामध्ये बसविण्याची कार्यवाही
करण्यात यावी.
२. राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा.
३.महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा.
४.छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा.
वरिल सर्व पुतळे बसविणे कामी मा.शासनाचे सर्व नियम व अटी यांची परवानगी घेवून येत्या वर्षामध्ये हे सर्व पुतळे बसविण्याचा माझा प्रयत्न राहील या करीता प्रत्येकी रक्कम रूपये १० लाखांची तरतुद करण्यात यावी.त्यासाठी पुतळे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ४० लाखाने वाढ करण्यात यावी.

*अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

* नळधारकाकडून जमा पाणी पट्टी या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २ कोटींने वाढ करण्यात यावी.

* पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख ने वाढ करण्यात यावी.

* **ॲम्बुलन्स खरेदी** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाखाने वाढ करण्यात यावी.

* सावेडी, बोल्हेगांव ,नागापुर या उपनगरांमधील नागरीकांचे आरोग्य विषयक सूविधा देणे करीता सावेडी येथील प्रभात बेकरी मागील जागेमध्ये ए.आर. च्या माध्यमातुन महानगरपालिकेचे अदयावत हॉस्पीटलची उभारणी करीता प्रशासनाने संबंधितांकडे पाठपुरावा करून गोरगरीब नागरीकांकरीता आरोग्य सेवा लवकर उपलब्ध करून दयावी.

* टि.डी.आर.च्या माध्यमातुन काही मोक्याच्या व विकसीत करता येत्‍ील अशा जागा महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आहेत. अशा जागेचा सर्व्हे करून त्या जागा विकसीत करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावेत.

* मा.राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या सुचनेच्या अनुषांगाने शहराच्या उर्वरीत सावेडी,बोल्हेगांव,केडगांव,मुकुंद नगर इ.परिसराच्या भुयारी गटर योजने करीता शहर उपनगर भुयारी गटर योजना टप्पा -२ मनपा हिस्सा नविन लेखाशिर्ष नविन लेखाशिर्षा अंतर्गत रू. ५ कोटींची तरतुद करण्यात यावी.

* कोविड -१९ प्रार्दुभाव रोखण्याकरीता आजार प्रतिबंधक उपया म्हणून शहर हद्दीमध्ये औषध फावरणी करण्यात यावी.या कामा करीता कोणताही निधी कमी पडू दिला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. हिवताप प्रतिबंधक योजना  कंत्राटी पध्दतीने फवारणी लेखाशिर्षांतर्गत रू.१५ लाखाने वाढ करण्यात यावी.
* रक्तपेढी औषधे व उपकरणे खरेदी करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १० लाखाने वाढ करण्यात यावी.

* **जेटिंग मशिन खरेदी** हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती तात्काळ अदा करण्यात यावी.

* जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम  करीता रूपये  ४९लाखांनी वाढ करण्यात यावी.

* समर्थ नगर उंच पाण्याची टाकी करीता १० लाखांनी वाढ  करण्यात यावी.

* शहरातील विविध ठिकाणी क्रीडांगणे विकसीत करणे करीता रक्कम रूपये ५ लाखांनी तरतुद वाढविण्यात यावी.

* मा.कै.शंकरराव घुले मा.नगराध्यक्ष यांचे कार्यकाळामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांकरीता टि.व्ही.सेंटर सावेडी या ठिकाणी मनपा कर्मचारी घरकुल योजना राबविण्यात आली होती.या योजनेला सुमारे तीस वर्षापेक्षा जादा कालावधी झाला आहे.या नंतर मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल योजना राबविण्यात आलेली नाही.या करीता नगररचना विभागाने जागा उपलब्ध करून दयावी व उपलब्ध जागेवर मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल राबविण्याचा माझा मानस आहे. "मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल योजना"या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

*मा.महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती ,महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती ,महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.५० लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

* **स्मशान भुमी सुधारणा** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाख रूपयांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील हजी हसन शहा कादरी कब्रस्तान करीता मा.शासनाकडून प्राप्त "अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र निधी " या लेखाशिर्षा अंतर्गत संरक्षण भिंतीचे बांधणे ,मेन गेट करणे,रस्ता कॉक्रीटीकरण करणे करीता रककम रूपये २० लाखांची कामे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावीत.

* विकास योजना जी.आय.एस. बेस्ड तयार करणे या नविन लेखाशिर्षा अंतरर्गत रक्कम रूपये ३ कोटी ची तरतुद करण्यात यावी.सदरचा खर्च अमृत योजना , १५ वा वित्त आयोग / विकास भार निधी किंवा वैशिष्टपुर्ण योजने आंतर्गत भागविण्यात यावा.

* रामचंद्र खुंट ते नालबंद खुंट चौका पर्यतचा रस्ता मजबुतीकरणा सह डांबरीकरण/ कॉक्रीटीकरण करणे करीता रक्कम रूपये ३० लाखांची तरतुद करण्यात यावी.सदर कामाकरीता "नविन रस्ते विकसीत करणे "या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.

* प्रभाग क्रमांक ११ मधिल कानडे मळा येथील चौधरी नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे तसेच कानडे मळा येथील प्रकाश काळे घर ते शिंदे घर ते आगरकर घर ते मेन रोड पर्यत कॉक्रीटीकरणक करणे तसेच तात्या भदर घर ते रासकर घर ते पुंड घर ते मेन रोड पर्यत कॉक्रीटी करण करणे या कामाकरीता रू.२० लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* प्रभाग क्र. ११ मधिल नवजीवन कॉलनी ,पुनममोतीनगर ,अरिहंत कॉलनी रस्त्याच्या साईडला पेव्हिंग ब्लॉक टाकणे तसेच सिताबन कॉलनी ते भिंगार नाल्या पर्यत पेव्हिंग ब्लॉक बसविणे या भागातील लाईट पोल शिप्ट करणे व झाडे लावणे व बाकडे बसविणे करीता रू.३० लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

* प्रभाग क्र. १० मधिल कोठला भागातील मोहरम मार्ग कॉक्रीटीकरणे / डांबरीकरण करणे करीता रू.२५लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

*प्रभाग क्रमांक १४ बुरूडगांव रोड येथील शंभुनगर ते आनंद पार्क पर्यत चा रस्ता मजबुती करणासह डांबरीकरण करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये २५ लाख **"विकास भार निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

* प्रभाग क्रमांक १० मधील मंगलगेट भागातील महानगरपालिकेच्या मालकीचा कत्तल खाना दुरूस्त करण्यात यावा.सदरचा खर्च **इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्कम रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

*प्रभाग क्रमांक ७ मधील चंदु आरडे घर ते जिल्हा परिषद मराठी शाळे ते बिरोबा मंदिर ते सिना नदी पर्यत ड्रेनज लाईन टाकाणे करीता रक्कम रूपये ३० लाख सदरचा खर्च **"विकास भार निधी"** अंतर्गत भागविण्यात यावा.

* प्रभाग क्र.८ मध्ये आनंद पार्क येथील मेन ड्रेनेज लाईन बबनराव लठाड घर ते अनुसया नगर ते लखापती यांच्या घरापर्यत तसेच शिंदे फिटनेस ते मळगंगा देवी मंदिर ते घोडके किराणा स्टोअर्स पर्यत तसेच दिनकर आधाव ते सिंहगड फेज १ ते मेवाडा नगर पर्यत ड्रेनेज

लाईन करणे अंदाजीत खर्च रक्कम रूपये ३० लाख तरतुद करण्यात यावी.सदर खर्च **नविन ड्रेनेज** या लेखाशिर्षअंतर्गत करण्यात यावा.

* आदर्श नगर येथील गणपती मंदिर ते अडसुळ किराणा ते डिपी रोड ते वाव्हळ सर घरापर्यत चा रस्ता कॉक्रीटीकरण करणे

सदर कामाचा अंदाजीत खर्च रक्कम रूपये ३० खर्च **नविन रस्ते विकसीत करणे** या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात यावा.

*"उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी. व या अंतर्गत दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा महानगरपालिकेमार्फत सत्कार करून त्यास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा. **"उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

***सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षामध्ये रूपये ४.५० लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर , अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ ,अमरधाम या सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये १लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

* महानगरपालिकेची जेथे हद्द सुरू होते. त्या ठिकाणापासून पुढे दोन किलोमिटर पर्यत सध्याच्या रोडला सर्व्हीस रोड (WBM) करण्याकरीता.सदर कामास लागणारा निधी करीता सार्व. बांधकाम विभागाने मा.शासन स्तरावर प्रस्ताव पाठवून निधी उपलब्ध करून घ्यावा.

* प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थीचे कर्ज मंजूर करून घेणे,योजनेची जाहिरात करणे,या कामी पी.एम.सी.ची नेमणूक करणे करीता प्रकल्प विभागाने तात्काळ प्रस्ताव सादर करावा. या कामा करीता येणारा खर्च **सर्वासाठी घरे मनपा हिस्सा** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यात यावा.रक्कम रूपये ५० लक्ष ने वाढ करण्यात यावी.

.

* शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२१-२०२२ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
( मा.श्री. अविनाश हरिभाउ घुले )
सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०२१-२२ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

| अहमदनगर महानगरपालिका अहमदनगर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मा. स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात) | | | | | |
| | | | | | |
| सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२१)......................................... ४५८.९६ | | | | | |
| एकुण जमा.................................................................... ७०४०३.२८ | | | | | |
| सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा............................................ ७०८६२.२४ | | | | | |
| एकुण खर्च................................................................... ७०५४०.२४ | | | | | |
| अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२२).................................. ३२२.०० | | | | | |
| अ. नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२१-२२** | मा.आयुक्त यांनी | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती |
| | | केलेली तरतूद | वाढ | घट | सभेने मंजुर |
| | | | | | केलेली तरतूद |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४०५०.०० | ६०७.५० | | ४६५७.५० |
| २ | बिगरशेती जमिनीवर कर | ०.०० | ६०.०० | | ६०.०० |
| ३ | ना हरकत प्रमाणपत्र (अग्निशमना) | ३.०० | ५.०० | | ८.०० |
| ४ | मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फी | १.०० | ७.०० | | ८.०० |
| ५ | गाळे हस्तांतरण फी | ७५.०० | २५.०० | | १००.०० |
| ६ | नोटीस फी/शास्ती | ४०००.०० | १७५.०० | | ४१७५.०० |
| ७ | अनधिकृत बांधकाम नियमाुकूल करणे | १२५.०० | १००.०० | | २२५.०० |
| ८ | मालमत्ता नावनोंदणी फी | ४२३.५० | ५०.०० | | ४७३.५० |
| ९ | गुंठेवारी विकास नियमित करणे | ५.०० | ६.०० | | ११.०० |
| १० | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ८.०० | १२.०० | | २०.०० |
| ११ | मनपा शाळा भाडेपासुन उत्पन्न | २०.०० | २५.०० | | ४५.०० |
| १२ | पे ॲण्ड पार्क | ११.०० | १०.०० | | २१.०० |
| १३ | मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क | १०.०० | २५.०० | | ३५.०० |
| १४ | जैव वैद्यकीय कचरा विलेवाट | ४५.०० | ३०.०० | | ७५.०० |
| १५ | घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासुन उत्पन्न | ३००.०० | ५०.०० | | ३५०.०० |
| १६ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | विकास भार निधी | ५००.०० | ५०.०० | | ५५०.०० |
| १७ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| १८ | रेखांकन अंतर्गत सुधाराणा (ले आऊट धारक) | १५०.०० | २५.०० | | १७५.०० |
| १९ | अनधिकृत ाळ नियमानुकूल करणे | १००.०० | १००.०० | | २००.०० |
| २० | पाणी विक्री जमा | २५.०० | ५०.०० | | ७५.०० |
| २१ | अमृत- भुयारी गटार योजना (फेज२ सर्व उपनगर) | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २२ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | २२००.०० | २००.०० | | २४००.०० |
| २३ | रस्ते फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | १५०.०० | १००.०० | | २५०.०० |
| २४ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | २१.०० | ५०.०० | | ७१.०० |
| | **एकुण** | **१२४४२.५०** | **२३७२.५०** | **०.००** | **१४८१४.५०** |

००००

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२१-२२** | मा.आयुक्त यांनी | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती |
|---|---|---|---|---|---|
| | | केलेली तरतूद | वाढ | घट | सभेने मंजुर |
| | | | | | केलेली तरतूद |
| १ | सावेडी गावठाण येथे शॉपिंग कौंम्लपेक्स बांधणे | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २ | विद्युत साहिय्त खरेदी व देखभाल | ११०.०० | ५०.०० | | १६०.०० |
| ३ | पुतळे बसविणे | ४०.०० | ४०.०० | | ८०.०० |
| ४ | कंत्राटी पध्दतीने पवारणी करणे | ३५.०० | १५.०० | | ५०.०० |
| ५ | जेंडार बजेट- महिला व बाल कल्याण कार्यक्रम | ५१.०० | ४९.०० | | १००.०० |
| ६ | मार्केट यार्ड/समर्थनगर येथे पाण्याची टाकी | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ७ | क्रीडांगणे विकासित करणे | १.०० | ५.०० | | ६.०० |
| ८ | मनपा कर्मचारी घरकूल योजना | १.०० | ५०.०० | | ५१.०० |
| ९ | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| १० | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १२ | सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १३ | विरोधी पक्षनेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १४ | सभापती, महिला व बाल कल्याण निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| १५ | उपसभापती, महिला व बाल कल्याण निधी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १६ | नविन रस्ते विकसीत करणे | १७५.०० | ३०.०० | | २०५.०० |
| १७ | नविन ड्रेनेज | ३०.०० | ३०.०० | | ६०.०० |
| १८ | उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव | १.०० | १.०० | | २.०० |
| १९ | सामाजिक संस्थांना देणगी | २.०० | २.५० | | ४.५० |
| २० | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |
| २१ | विकास भार निधी | १२५.०० | १२.५० | | १३७.५० |
| २२ | विकास भार निधी (नगररचना भू-संपादन) | ३७५.०० | ३७.५० | | ४१२.५० |
| २३ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| २४ | रेखांकन अंतर्गत सुधाराणा (ले आऊट धारक) | १५०.०० | २५.०० | | १७५.०० |
| २५ | अमृत- भुयारी गटार योजना (फेज-२ सर्व उपनगर) | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २६ | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत, १५ वा वित्त आयोग/ विकास भार किंवा वैशिष्टपूर्ण इ.योजना) | ०.०० | ३००.०० | | ३००.०० |
| २७ | नविन वाहन खरेदी (अग्निशमन विभाग) | ८०.०० | २५.०० | | १०५.०० |
| २८ | स्मशानभूमी सुधारणा | १.०० | २०.०० | | २१.०० |
| २९ | नविन शववाहिनी/ॲम्बुलन्स खरेदी करणे | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ३० | जेटीग मशिन खरेदी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ३१ | मनपा रकतपेढीसाठी औषधे व उपकरणे खरेदी | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ३२ | इमारत दुरुस्ती | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| ३३ | सर्वांसाठी घरे (मनपा हिस्सा) | १००.०० | ५०.०० | | १५०.०० |
| | **एकुण** | **१५६७.००** | **२३७२.५०** | | **३९३९.५०** |

सही /-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका